आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२० । रविवार ८ फेब्रुवारी २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## शिवसेना उमेदवाराचा भाजपच्या बुथवर राडा



छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीदरम्यान ठाकरेंच्या शिवसेनेच्या उमेदवाराने राडा करत भाजपच्या बुथवर जाऊन तोडफोड केली. बजाजनगर येथील मतदान केंद्राच्या अवघ्या २०० मीटर परिसरावर हा तुफान गोंधळ झाला. शिवसेनेचे उमेदवार अनिल चोरडिया असे गोंधळ घालणाऱ्या तसेच मारहाण करणाऱ्या उमेदवाराचे नाव आहे. ४० ते ५० कार्यकर्त्यांसह भाजप पुरस्कृत उमेदवाराच्या बुथवर जाऊन धमकी आणि दमदाटी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. विशेष म्हणजे महिलांनाही दमदाटी आरेरावी केली आहे. दरम्यान, ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

## महत्त्वाचे..

### भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्सची खरेदी करणार

भारत आणि अमेरिकेने अंतरिम व्यापार कराराचा आराखडा जाहीर केला आहे. या कराराअंतर्गत, भारतीय वस्तूंवरील अमेरिकेचे शुल्क ५० वरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आलं आहे. रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतावर लादण्यात आलेला अतिरिक्त २५ कर देखील काढून टाकण्यात आला आहे. दोन्ही देशांनी सांगितले की फ्रेमवर्क लवकरच लागू केली जाईल आणि वाटाघाटी व्यापक द्विपक्षीय व्यापार करार च्या दिशेने पुढे जातील. भारत-अमेरिका संयुक्त निवेदनानुसार ही फ्रेमवर्क १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू झालेल्या भारत-अमेरिका व्यापार कराराच्या वाटाघाटींना पुढे नेईल. या करारात बाजारपेठेत प्रवेश, पुरवठा साखळी मजबूत करणे आणि व्यापारातील अडथळे कमी करणे या तरतुदींचा समावेश असेल. या कराराअंतर्गत, भारत अमेरिकन औद्योगिक वस्तूंवरील सर्व शुल्क काढून टाकेल किंवा कमी करेल.

### झापुक । zupuk

पूर्वी चांदीचे
चमचे होते
आता चांदी
आहे चमच्यांची
२४ कॅरेट
सोन्यापेक्षा
चमक आहे
बेंटेक्सची

नवनाथ कुताळ
९४२२२३१८२५

# सरकारी रुग्णालयातील मोफत उपचाराला ब्रेक

## प्राथमिक आरोग्य केंद्रापासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत नवे दर लागू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे : अडीच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या 'पूर्ण मोफत उपचार' निर्णयाला राज्याच्या आरोग्य विभागाने आता यू-टर्न घेत, राज्यातील शासकीय रुग्णालयांत पुन्हा शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे.**

प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हा व महिला रुग्णालयांपर्यंत नवे दर लागू होणार असून, बाह्यरुग्ण विभागातील केसपेपरसाठी ५ रुपयांपासून ते सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ४० हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाणार आहे.

तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी राज्यातील सर्वच आरोग्य विभागाच्या रुग्णालयात धाडसी निर्णय घेत, मोफत उपचार सुरू केले होते. त्याची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२३ मध्ये सुरू झाली. तेव्हापासून आतापर्यंत सर्वच ठिकाणी मोफत उपचार होतात.

यामध्ये केसपेपर काढण्यापासून रक्तपासणी, इतर सर्व तपासण्या आणि सर्व उपचार मोफत आहेत. परंतु, गेल्या काही दिवसांत ही संकल्पना व्यवहार्य ठरत नसल्याचा साक्षात्कार आरोग्य विभागाला झाला असून, अलीकडेच जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, आता उपचारासाठी दर लागू केले आहेत. याबाबत आरोग्य हक्क कार्यकर्ते शरद शेट्टी म्हणाले, ''शासन निर्णयातील शुल्क कागदावर कमी वाटत असले, तरी शासकीय रुग्णालयांत येणारे बहुतांश रुग्ण समाजातील अत्यंत दुर्बल घटकांतील असतात. त्यासाठी मोफत उपचार असावेत.

खासदार, आमदार आदींसाठी मोफत उपचारांचा उल्लेख आहे, जे प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयांत उपचार घेतच नाहीत. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करावा.''

सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांनुसार, काही घटकांना मोफत उपचारांचा लाभ कायम राहणार आहे. यात शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय, शासकीय रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, ऑक्युपेशनल व फिजिओथेरपीचे विद्यार्थी, न्यायालयीन कोठडीत असलेले व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे कुटुंबीय, वैद्यकीय-न्यायवैद्यकीय प्रकरणांतील रुग्ण, न्यायालयीन चौकशीतील कैदी, पोलिसांकडून पाठविलेली प्रकरणे, कुष्ठरोग मंडळामार्फत पाठवलेले रुग्ण, आश्रमशाळा व महिला सुधारगृहांमार्फत पाठवलेले रुग्ण, शहरी भागातील निराधार मुले, आमदार, खासदार, मंत्री, न्यायाधीश यांचा समावेश आहे.

### पहिली प्रसूती मोफत

**पहिली प्रसूती मोफत असून, दुसऱ्यासाठी ५० रुपये, तर तिसरी व पुढील प्रत्येक प्रसूतीसाठी २५० रुपये शुल्क आकारले जाईल. वातानुकूलित खोलीसाठी दररोज १५० रुपये आणि साधारण खोलीसाठी ७५ रुपये, आयसीयूसाठी १०० रुपये, तसेच प्रत्येक डायलिसिससाठी १५० रुपये आकारले जातील. मृतदेह एम्बालिंगसाठी १५०० रुपये शुल्क राहील. रुग्णवाहिकेसाठी प्रति किमी ५ रुपये व ८ तासांनंतर प्रति तास ३० रुपये प्रतीक्षा शुल्क आकारले जाईल, तर सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ४० हजार रुपयांत करण्यात येईल.**




### असे आहेत नवीन दर

**रुग्णालयात दाखल रुग्णांना दररोज १० रुपये प्रवेश शुल्क द्यावे लागेल. एमआरआय स्कॅनसाठी १ हजार ६०० रुपये मोजावे लागतील. हिमोग्लोबिन, टीएलसी, डीएलसी, रक्तगट व आरएच तपासणी, लघवीच्या रासायनिक चाचण्या, कल्चर-सेंसिटिव्हिटी अशा प्रत्येक रक्ततपासणीसाठी १५ रुपये आकारले जातील. मूत्रपिंड व मूत्राशय तपासणीसाठीची इंट्राव्हेनस पायलोग्राम एक्स-रे प्रतिस्कॅन १०० रुपये, डोक्याचा सीटी स्कॅन ३०० रुपये, तर मणका, मान व छातीचा सीटी स्कॅन ४०० रुपये असेल. भूल देऊन करण्यात येणाऱ्या लहान-मोठ्या शस्त्रक्रियांकरिता ६० ते १६० रुपये आकारले जातील.**

# १२ जिल्हा परिषदेसाठी मतदान पूर्ण

## ९ फेब्रुवारीच्या मतमोजणीकडे राज्याचे लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीची मतदान प्रक्रिया आज पार पडली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकांच्या तारखेमध्ये बदल करण्यात आला होता. त्यानुसार ५ फेब्रुवार रोजी होणारे मतदान आज ७ फेब्रुवारी रोजी झाले. मतमोजणी ९ फेब्रुवारीला होणार आहे. नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांप्रमाणे प्रमाणेच जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजप बाजी मारेल का? याबाबत राज्याला उत्सुकता आहे.

**सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच दरम्यान ही मतदान प्रक्रिया पार पडली. काही ठिकाणी सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. निवडणूक आयोगाकडून आणि जिल्हा प्रशासनाकडून या मतदान प्रक्रियेची तयारी सध्या सुरु आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर संबंधित १२ जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदानानंतर ९ फेब्रुवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल.**

दरम्यान, आज काही अपवाद वगळता सर्व ठिकाणी शांततेच मतदान झाले. काही ठिकाणी अल्प तर काही ठिकाणी मतदारांनी मतदानासाठी चांगला प्रतिसाद दिला.

दरम्यान, राज्यभरातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी (७ फेब्रुवारी) मतदान पार पडणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी मतदान झाले. एकूण ७ हजार ४३८ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले. जिल्हा परिषदेच्या जागांसाठी २ हजार ६२४ तर पंचायत समितीसाठी ४ हजार ८१४ उमेदवार मैदानात उतरले आहेत.

# पाथर्डीत अल्पवयीन मुलीचा विवाह

## ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील पत्र्याचा तांडा येथे १५ वर्षे ३ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीच्या विवाह प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली असून, प्रशासनाची भूमिका काय राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



या प्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी तथा बालविवाह प्रतिबंधक अधिकारी गोपीचंद नवनाथ रोंढे (वय ३७) यांनी फिर्याद दिली आहे. दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथील 'उडान प्रोजेक्ट'च्या प्रतिनिधींनी दूरध्वनीद्वारे पत्र्याचा तांडा येथे अल्पवयीन मुलीचा बालविवाह झाल्याची माहिती दिली. त्यानुसार रोंढे यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात धाव घेत चौकशी सुरू केली.

बालविवाह प्रतिबंधक अधिकारी या नात्याने अल्पवयीन मुलीचा लेखी जबाब नोंदविण्यात आला. त्यात दि. २५ जानेवारी २०२६ रोजी आपला साखरपुडा झाल्याचे तिने मान्य केले; मात्र १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी लग्न नको असून शिक्षण घ्यायचे असल्याचे तिने स्पष्ट केले. मुलीच्या आई-वडिलांनीही साखरपुड्याची कबुली देत, कायदेशीर वय पूर्ण झाल्यानंतरच विवाह करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व संबंधितांना बालकल्याण समिती, अहिल्यानगर यांच्यासमोर हजर करण्यात आले. तेथेही लग्न कायदेशीर वयानंतरच होईल, अशी हमी देण्यात आली. मात्र याच दिवशी सायंकाळी 'उडान प्रोजेक्ट'कडून प्राप्त छायाचित्रांमध्ये विवाह झाल्याचे दिसत असल्याचा दावा करण्यात आला. या छायाचित्रांमुळे बालविवाहाचा संशय अधिक गडद झाला. प्राप्त पुराव्यांच्या आधारे दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी संतोष महादेव राठोड, मुलीचे आई-वडील, मुलाचे आई-वडील तसेच छायाचित्रांमध्ये दिसणाऱ्या इतर अनोळखी व्यक्तींविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक अधिनियमातील कलम ९, १० व २१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे बालविवाहास प्रतिबंध घालण्याबाबत प्रशासन किती कठोर भूमिका घेते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### बालविवाह प्रकरणात कायदा काय सांगतो?

- बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार बालविवाह हा दखलपात्र व शिक्षेस पात्र गुन्हा आहे.
- कलम ९ : अल्पवयीन मुला-मुलीचा विवाह लावणारा थेट गुन्हेगार ठरतो.

कलम १० : बालविवाहास मदत, प्रोत्साहन किंवा आयोजन करणाऱ्यांवरही कारवाई होते.

- कलम २१ : माहिती असूनही दुर्लक्ष करणाऱ्यांनाही शिक्षा होऊ शकते.

बालविवाह हा केवळ सामाजिक प्रश्न नसून गंभीर गुन्हा असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# 'सौंदाळा' झाले जातमुक्त!

- **ग्रामसभेचा ऐतिहासिक निर्णय**
- **जात, पंथ, धर्म, वंश याबाबत भेदभाव मिटला**
- **आंतरजातीय विवाहासाठी ग्रामपंचायत मदत करणार**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील सौंदाळा येथील ग्रामस्थांनी आपले गाव जातमुक्त झाल्याची घोषणा नुकत्याच झालेल्या ग्राम सभेत केली. यासंबंधीचा ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला असून, असा निर्णय घेणारे सौंदाळा हे राज्यातील पहिले गाव ठरले आहे.

विविध समाजोपयोगी उपक्रम राबवणाऱ्या नेवासा तालुक्यातील सौंदाळा ग्रामपंचायतीने जातमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सध्या जात-धर्मावरून सर्वत्र वादंग होत आहेत. त्याचा परिणाम समाजावर, गावांवर होत आहे. त्यामुळे आपल्या गावांपासून जातमुक्तीची सुरुवात करण्यासाठी सौंदाळा ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. गावात स्वातंत्र्य, समता, बंधुता अंगीकारण्यासाठी जातमुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. गावातील वेगवेगळ्या पंधरा लोकांनी रक्तदान करून एकोपा दाखवला. त्यानंतर त्यानंतर सरपंच शरद



### शिव्या द्याल तर ५०० रूपये दंड

**सौंदाळा ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार गावात जर का कोणी शिवी दिली तर त्याला ५०० रूपयांचा दंड केला जाईल. अनेक वेळा भांडणं झाल्यानंतर कारण नसताना आई बहिणींवरून शिव्या दिल्या जातात. त्यात आई बहीणींची चुकी नसताना असे अपशब्द वापरले जातात. हे टाळले जावे यासाठी ग्रामसभेना हा निर्णय घेतला आहे.**

आरगडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत गाव 'जातमुक्त' झाल्याची घोषणा केली. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्राम सभेला गावाच्या (पान ४ वर)



## संपादकीय

# निर्णयाविना भरतीचा खेळखंडोबा

राज्यातील खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीची प्रतीक्षा करणारे हजारो उमेदवार पुन्हा एकदा निराश झाले आहेत. शिक्षण संचालनालयाने डॉ. महेश पालकर यांच्या आदेशानुसार सन २०२४-२५ ची ऑनलाइन संचमान्यता पूर्ण होईपर्यंत नवीन भरती, वैयक्तिक मान्यता आणि शालार्थ आयडी देण्यावर तात्पुरती बंदी घातली आहे. अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन झाल्यानंतरच रिक्त जागांवर भरतीचा विचार, असे स्पष्ट निर्देश आहेत. संस्थांकडून २८ मे २०२५ पूर्वीच्या नियुक्त्या, मान्यता आणि प्रलंबित शालार्थ आयडीची माहिती २४ डिसेंबर २०२५ पर्यंत मागवली आहे. ही बातमी ऐकताच उमेदवारांच्या धाकधुकीत भर पडली आहे. मात्र ही फक्त एका विभागाची समस्या नाही; ही शिक्षण खात्यातील दीर्घकाळ चाललेल्या अनिर्णय, प्रशासकीय ढिलाई आणि प्रणालीगत कमतरतांची एक नवीन कडी आहे. शिक्षक भरतीचा इतिहासच वादग्रस्त आहे. गेली अनेक वर्षे शिक्षक भरती रखडली. टीईटी, टेट, ताइत अशा परीक्षांचे नवे-नवे रूप येत गेले. पवित्र पोर्टल आणले गेले, तरीही भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबली. कंत्राटी शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षकांवर अवलंबून शाळा चालवाव्या लागल्या. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची स्थिती तर अधिक वाईट. २००५ नंतर खासगी शाळांमध्ये शिक्षकेतर पदांची मोठी भरती झालीच नाही. २०१९ च्या सुधारित आकृतिबंधानुसार कनिष्ठ लिपिक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक यांसाठी सुमारे ३० हजार पदे निर्माण होणारी होती. कनिष्ठ लिपिक १७ हजार ६९५, ग्रंथपाल २ हजार ११८, प्रयोगशाळा सहायक ६ हजार ७२५ अशी आकडेवारी आहे. संघटनांनी न्यायालयीन लढाई, रस्त्यावरील आंदोलने करून शासनाला भाग पाडले. परंतु आता पुन्हा 'संचमान्यता' चा अडथळा उभा राहिला आहे.संचमान्यता ही शाळेतील विद्यार्थी पटसंख्येनुसार शिक्षक-कर्मचारी पदे मंजूर करण्याची प्रक्रिया आहे. ती ऑनलाइन, एनआयसीमार्फत सुरू आहे. मात्र ती पूर्ण होण्यास नेहमीच उशीर होतो. २०२५-२६ साठी २० ऑक्टोबर २०२५ पर्यंतची आधार वैध विद्यार्थी संख्या ग्राह्य, १५ जानेवारी २०२६ पर्यंत निर्गमित करावी, अन्यथा वेतन थांबेल, असे आदेश आहेत. यात त्रुटी, पडताळणी, अपडेटिंग यांचा खेळ सुरू असतो. परिणामी रिक्त पदे भरणे लांबते, अतिरिक्त ठरणारे कर्मचारी समायोजित होत नाहीत आणि नवीन भरतीला 'ब्रेक' बसतो.यात शालार्थ आयडीची भूमिका महत्त्वाची आहे. शालार्थ ही वेतन व मानवी संसाधन प्रणाली आहे. पण तिच्या नावाने घोटाळ्यांचा इतिहास आहे. नागपूरमधील शालार्थ आयडी घोटाळ्यात हजारो भूत शिक्षक, अयोग्य नियुक्त्या, कोट्यवधी रुपयांचा अपहार उघडकीस आला. अटके झाल्या, ऑडिट झाले. त्यानंतर शासनाने कडक तपासणी सुरू केली. नियुक्ती, जॉइनिंग रिपोर्ट, हजेरी नोंदवही, संस्था ठराव यांची तपासणी बंधनकारक झाली. संस्थाचालकांवरही गुन्हे दाखल होऊ लागले. पण या कडक नियमांचा परिणाम सर्वसामान्य उमेदवारांवर झाला. वैध नियुक्ती असूनही शालार्थ आयडी मिळणे कठीण झाले. आता तर नवीन आयडी देण्यावरच बंदी आहे.या सगळ्याचा परिणाम कोणावर होतो? प्रथम, विद्यार्थ्यांवर. शिक्षक कमी, शिक्षकेतर कर्मचारी अपुरे असल्याने शिक्षकांना अशैक्षणिक कामे करावी लागतात. क्लार्क, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक नसल्याने शाळेचे प्रशासन, ग्रंथालय, विज्ञान प्रयोग यांना खीळ बसते. खासगी शाळांवर अतिरिक्त आर्थिक भार पडतो. संस्थाचालक कंत्राटी कर्मचारी नेमतात किंवा कामे शिक्षकांकडेच ढकलतात. दुसरे, उमेदवारांवर. वर्षानुवर्षे तयारी करणारे तरुण निराश होतात. काहींनी दुसरी नोकरी स्वीकारली, काहींनी शिक्षण सोडले. तिसरे, शिक्षण व्यवस्थेवर. गुणवत्ता, पारदर्शकता, जबाबदारी यांचा अभाव निर्माण होतो. शिक्षण खाते नेहमीच 'प्रक्रिया सुरू आहे', 'संचमान्यता होईल', 'पुढील आदेश येतील' अशा गोष्टी सांगते. पण वास्तवात निर्णय घेण्यास, कालबद्ध वेळापत्रक पाळण्यास हात आखडता घेतला जातो. ऑनलाइन प्रणाली आणली, पण ती वेगवान झाली नाही. घोटाळे झाले, पण त्यांचा फटका वैध प्रक्रियांनाही बसला. संघटना आंदोलने करतात, न्यायालयात जातात, तरीही समस्या कायम.शासनाने यावर ठोस उपाय शोधणे गरजेचे आहे. संचमान्यता प्रक्रियेला कडक मुदत द्या, ती ऑटोमेटेड करा. अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन वेगाने करा. शालार्थ आयडीसाठी वेगळी, जलद तपासणी यंत्रणा उभी करा. शिक्षकेतर पदभरतीसाठी स्वतंत्र कॅलेंडर तयार करा. ८० टक्के भरतीचा नियम ठीक आहे, पण तो अंमलात येण्यासाठी इच्छाशक्ती हवी. शिक्षण ही प्राधान्याची बाब आहे. तिच्यात राजकारण, ढिलाई किंवा घोटाळे सहन करणे परवडणारे नाही.उमेदवारांची प्रतीक्षा संपवा, शाळांना पुरेसे मनुष्यबळ द्या, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या. अन्यथा 'शिक्षण सर्वांसाठी' हे बोधवाक्य फक्त कागदावरच राहील. शिक्षण खात्याने आता अनिर्णय सोडून निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

# श्री तिरुपती बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव मोठ्या उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राजेंद्र परदेशी :** राहुरी येथील श्री तिरुपती बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव मोठ्या उत्साहाने व आनंदाने संपन्न झाला. वैकुंठवासी हिरा दास बाबा आणि वैकुंठवासी नारायणदास बाबा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले राहुरी शहराचे वैभव असलेले श्री बालाजी मंदिर येथे ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी श्री श्री. १००८ जगद्गुरु श्री घनशामाचार्यजी महाराज यांच्या उपस्थितीत सर्व कार्यक्रम संपन्न झाले.

बालाजी मंदिरात सकाळी आठ वाजता श्री बालाजी भगवान यांना अभिषेक करण्यात येऊन महाआरती संपन्न झाली. यावेळी श्री बालाजी भगवान यांना शृंगार करून मनमोहक असे सजविलेले होते. त्यामुळे त्यांचे रूप अधिकच खुलून दिसत होते. महाआरती झाल्यानंतर सर्व भाविक भक्तांनी विविध प्रकारचा पेहराव करून सजवलेल्या रथातून श्री बालाजी भगवान मूर्तीची राहुरी शहरातून भाविक भक्तांनी भजनाच्या गजरात व बँड पथकांच्या जयघोषात मिरवणूक काढली यावेळी भाविक भक्तांनी मोठ्या जल्लोषात व आनंदात मिरवणुकीत सहभाग घेतला होता. राहुरी शहरातून मिरवणूक सायंकाळी साडेसात वाजता मंदिरात आल्यानंतर गुरु महाराजांचे प्रवचन झाले यावेळी भाविकांनी मंदिरात एकच गर्दी केली होती.

यावेळी भाविक भक्तांना उपदेश करताना गुरु महाराजांनी मानवी जीवनातील काही रहस्यांचा उलगडा केला व प्रपंचात व परमेश्वर चिंतनात आपण कसे वागले पाहिजे परमेश्वरासाठी काय केले पाहिजे व परमेश्वरासाठी केलेला नाम जप हा आपल्याला संसार रुपी नावेतून तारुन नेतो. व आपल्याला संसार सुख हे नाम जपानेच मिळते त्यामुळे परमेश्वराच्या नाम जपाचे महत्त्व नवीन पिढीने जपले पाहिजे व घेतले पाहिजे अशा प्रकारे भाविकांना उपदेश पर मार्गदर्शन करून या कार्यक्रमाची महाप्रसादाने सांगता झाली. आलेल्या सर्व भाविक भक्तांना श्री बालाजी न्यास मंदिराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते आलेल्या सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# गणित - विज्ञान प्रदर्शनाच्या अनुदानात वाढ

## विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला अधिक पाठबळ : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** शिक्षक आणि पालकांनी संधी निर्माण करून दिल्यास जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी गुणवता प्राप्त करू शकतात. जिल्हास्तरीय गणित विज्ञान प्रदर्शानाच्या अनुदानात १कोटी रुपयांची वाढ केल्याने विद्यार्थ्यामधील संशोधन वृतीला अधिक पाठबळ मिळेल असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.



तालुक्यातील एकरूखे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला जिल्हा नियोजन समितीतून उपलब्ध झालेल्या सुमारे ७४ लाख रुपयांच्या निधीतून चार वर्ग खोल्याचे तसेच इंटरअॅक्टीव्ह बोर्डचे उद्घाटन आणि ग्रामपंचायत इमारतीचे लोकार्पण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी श्रेयस नालकर याची इस्रो सहलीसाठी निवड झाल्याबद्दल तसेच अन्य गुणवता प्राप्त विद्यार्थ्यांचे मंत्री विखे पाटील यांनी अभिनंदन केले.

ग्रामीण आणि शहरी आशी स्पर्धा आता राहीलेली नाही. आपल्या बुध्दीकौशल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी आता चांगली प्रगती करून पुढे येत आहेत. आपल्या तालुक्याची शैक्षणिक गुणवता चांगल्या पध्दतीने राखली जात असल्याचे समाधान व्यक्त करून विद्यार्थ्याच्या शिक्षणात कोणतीही अडचण येवू नये असा प्रयत्न आपला असतो.

आज अनेक विद्यार्थी गणित विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून आपली गुणवता सिध्द करून दाखवत आहेत.या विद्यार्थ्याना अधिक संधी मिळाव्यात म्हणून यंदाच्या वर्षापासून प्रदर्शानाच्या अनुदानात एक कोटी रुपयांची वाढ आपण केली असून विद्यार्थ्यां मधील संशोधन वृतीला अधिक चालना देण्याकरीता वैज्ञानिक सहली करीता सुध्दा निधीची तरतूद जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यातून करणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

तालुक्यातील गावांच्या विकास प्रक्रीयेला योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देत असतो.विकास प्रक्रीया निरंतरपणे सुरू आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी गावातील पदाधिकारी कार्यकर्ते यांनी अधिक पुढाकार घेण्याची अपेक्षा मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली.

# बिबट्याचे वास्तव्य, एक कुत्रा फस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** सोनई-लांडेवाडी, शनिशिगंनापूर रस्त्यावरील लिपाने वस्ती, व घावटे वस्ती परिसरात या गेल्या आठ दिवसापासून बिबट्याने थैमान घातल्याने तेथील नागरिकांनी धसका घेतला आहे. रात्री दोन दोन वाजेपर्यंत जागरण करावे लागत आहे. दरम्यान लिपाने वस्ती वरील रमेश लिपाने व उद्योजक जुगल बंग यांना बिबट्याचे दर्शन झाल्याने त्यांनी धसका घेतला आहे. लिपाने यांचा येथून दोन कुत्र्यापैकी एका कुत्र्याचा बिबट्याने फडशा पाडला आहे.

शेळी जखमी केल्याची घटना घडल्या आहे. परत परत बिबट्या हा येत असून अनेकांना दर्शन दिले आहे. बिबट्या दोन दिवसापूर्वी पहाटे बंग व लिपाने फिरायला गेले असता त्यांना बिबट्या आडवा गेल्याने कसेबसे घरी जीव मुठीत घेऊन घरी गेले. त्यामुळे सर्व परिसरात व मार्गांवर विजपुरवठा अखंडित चालू ठेवावा. वनखात्याने बिबट्याच्या हल्ल्यात बळी पडण्याअगोदर बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी व्यावसायिक जुगल बंग, किशोर बंग व शेतकरी रमेश लिपाने यांनी केली आहे.

या भागात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतीचे कामे करण्यास नागरिकांनी धसका घेतलेला आहे. या परिसरात रात्री आठच्या नंतर घराबाहेर पडायला नागरिक घाबरत आहे. तरी संबंधित वन खात्याने याकडे लक्ष देण्याची मागणी लिपाने यांनी केली आहे.

# पुणतांबा येथील इच्छुक उमेदवारामंध्ये वाढला संभ्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** अहिल्या नगर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीबाबद अजूनही काही कारणामुळे निवडणूक कार्यक्रम जाहिर झालेला नाही, तो लवकरच जाहिर होईल अशी अपेक्षा राजकीय वर्तूळात व्यक्त केली जात आहे. असे असले तरी जिल्हा परिषद पुणतांबा गट व पंचायत समिती गणात इच्छुक उमेदवारांनी निवडणूकीच्या अनुशंगाने मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

जिल्हा परिषद पुणतांबा गट अनुसूचित जातीसाठी तर पंचायत समितीचा गण सर्वसाधारण ( माहिला ) प्रवर्गासाठी आहे त्यामुळे संभाव्य इच्छुक उमेदवारांनी गाठीभेटी सुरू केल्या आहेत काहींनी तर आतापासून समाज माध्यमाचा वापर सुरू करून आपली अप्रत्यक्षरित्या उमेदवारी जाहिर केल्याची चर्चा आहे पुणतांब्यासह ११ गावे राहाता तालुक्यात असली तरी ही गावे कोपरगाव मतदारसंघात आहे तालुक्यावर नाराधाकृष्ण विखे पाटील व मा. खा सुजय विखे यांचे निर्विवाद वर्चस्व आहे असे असले तरी गणेश कारखान्याची निवडणूक व पुणतांबा, वाकडी व चितळी गावच्या ग्रामपंचायत निवडणूकीत झालेले सत्तांतर यामुळे कोल्हे गटाची ताकद वाढली आहे. त्यातच कोपरगाव नगरपालिका जिकंल्यामुळे आगामी निवडणूकीत पूर्ण ताकदीने उतरण्याची शक्यता आहे. आ आशुतोष काळे स्वतंत्र पॅनेल उभे करणार की निवडणूकीबाबद स्थानिक कार्यकर्त्यवर निर्णय सोपविणार या बाबतचे उत्तर निवडणूका जाहिर झाल्यावर मिळणार आहे. पंधरा दिवसापूर्वी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुणतांबा येथे विकासकामांचे उद्घाटन करून जाहिर सभा घेतली.या सभेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला पालकमंत्री असल्यामुळे सभेला बहुतांशी पक्षाचे कार्यकर्ते हजर होते अनेकांनी व्यासपीठावर आपली मनोगते व्यक्त केली बहुतांशी पक्षाचे नेते उपस्थित असल्यामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक हया गटात व गणात बिनविरोध होणार का ? अशी चर्चा सुरु झाली आहे त्यामुळे संभाव्य इच्छुक उमेदवारामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे आगामी निवडणूकीत पुणतांबा गट व गणाबाबद ना राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे हेच अंतिम निर्णय घेणार आहे.तसेच कोल्हे गटाकडून माजी आ. स्नेहलता कोल्हे व विवेक कोल्हे यांचा शब्द अंतिम राहणार आहे. त्यामुळे सध्या राजकीय घडमोडींना वेग आला आहे त्यातच गावातील काही स्थानिक नेते वेळप्रसंगी पक्षातंर करण्याची परिसरात गेल्या काही दिवसापासून चर्चा आहे राजकारणात कधी काय होऊ शकेल याचा नेम नसल्यामुळे इच्छुक उमेदवार मात्र संभ्रमात आहे.

# तांभेरे येथे नूतन ग्रामपंचायत कार्यालयाचे लोकार्पण



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत राहुरी तालुक्यातील तांभेरे येथे उभारण्यात आलेल्या नूतन ग्रामपंचायत कार्यालयाचा लोकार्पण सोहळा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मारुती मुसमाडे होते.

यावेळी बोलताना प्राजक्त तनपुरे म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात या ग्रामपंचायत कार्यालयासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला, याचे विशेष समाधान आहे. याच कालावधीत राहुरी तालुक्यात सुमारे १५ नवीन तलाठी व ग्रामपंचायत कार्यालयांसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. नूतन इमारतीमुळे ग्रामस्थांना सुसज्ज भौतिक सुविधा मिळून शासकीय कामकाज अधिक जलद, पारदर्शक व लोकाभिमुख होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयातून लोकसेवेचे कार्य अधिक सक्षम होईल, असेही ते म्हणाले.

ग्रामीण भागातील पाणीप्रश्नाबाबत बोलताना त्यांनी निळवंडे धरणाच्या कालव्यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या माध्यमातून १,२५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे नमूद केले. मात्र, एवढा मोठा प्रश्न सोडवूनही जनतेकडून अपेक्षित कौल मिळाला नाही, याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली.

कार्यक्रमास सरपंच डॉ. उमेश मुसमाडे, डॉ. सुधाकर मुसमाडे, अशोक मुसमाडे, नितीन गागरे यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते. माजी सरपंच अशोक नाना मुसमाडे व सदस्य चंद्रकांत कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मेजर ताराचंद गागरे यांनी केले.

# राहुरीच्या व्यापारी चळवळीचे नेतृत्व पुन्हा प्रकाश पारख यांच्याकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील व्यापारी वर्गाच्या हितासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या राहुरी शहर व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रकाश पारख यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली आहे. गुरुवारी (५ फेब्रुवारी) झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत त्यांच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. या निवडीमुळे व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण असून, शहराच्या व्यापारपेठेला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कोअर कमिटीच्या या महत्त्वपूर्ण बैठकीस २२ सदस्य उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीस मागील कार्यकाळातील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मागील काळात व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रकाश पारख यांनी प्रभावीपणे भूमिका मांडत प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा केला, याबद्दल सदस्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. त्यांच्या अनुभवाची आणि व्यापाऱ्यांमधील विश्वासार्हतेची दखल घेत विलास तरवडे यांनी त्यांच्या नावाची सूचना मांडली. त्यास उपस्थित सर्व सदस्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने पाठिंबा दिला.अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पारख यांनी आगामी कार्यकाळासाठी 'व्हिजन २०२६' जाहीर करत दिशा स्पष्ट केली. आजच्या स्पर्धात्मक युगात स्थानिक व्यापाऱ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर 'आपला स्थानिक व्यापारी, आपली जबाबदारी' हे अभियान राबवून स्थानिक ग्राहकांना राहुरीच्या बाजारपेठेकडे आकर्षित करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

# उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली; आदिवासी बचाव समिती आक्रमक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** राहुरी तहसील कार्यालयासमोर करजगाव येथील आदिवासी भिल्ल समाजातील महिलांचे सुरू असलेले उपोषण चौथ्या दिवशी अधिक तीव्र झाले असून उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर आदिवासी बचाव समितीने रविवारी (८ फेब्रुवारी) नगर-मनमाड महामार्ग राहुरी बसस्थानकासमोर अडवण्याचा इशारा दिला आहे.

आदिवासी बचाव समितीचे संस्थापक सदस्य ज्ञानेश्वर अहिरे यांनी सांगितले की, करजगाव येथे आदिवासी भिल्ल समाजातील महिला व पुरुषांवर प्राणघातक हल्ला झाला. या घटनेनंतर पोलिसांनी तीन दिवसांनी फिर्याद नोंदवली. गुन्हा दाखल झाला असला तरी आरोपी गावात मोकाट फिरत असून फिर्यादी कुटुंबाला धोका निर्माण झाला आहे. हल्ल्यातील महिलांचे जबाब अद्याप नोंदवले गेले नाहीत, तसेच विनयभंग व जीवे मारण्याचा प्रयत्न यांसारखी गंभीर कलमे न लावता केवळ मारहाणीचे कलम लावण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

शिवाजीराव गांगुर्डे, कैलास माळी, दिलीप बर्डे आणि भास्कर बर्डे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर यांची भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात प्रशासनाने उपोषणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. चार दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर बसलेल्या महिलांची कोणत्याही अधिकाऱ्याने विचारपूस केली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत असल्याने समाजात तीव्र नाराजी पसरली असून मागण्या मान्य न झाल्यास रविवारी नगर-मनमाड महामार्ग अडवून निषेध नोंदवला जाईल, असा इशाराही आदिवासी बचाव समितीने दिला आहे. या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी राहुरी पोलिस प्रशासनावर राहील, असेही अहिरे यांनी स्पष्ट केले.

# बास्केटबॉल मैदानावर प्रवराच्या खेळाडूंचा 'विखे पॅटर्न'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :**जळगाव येथील गोदावरी फाउंडेशनच्या डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये आयोजित 'बास्केटबॉल लीग' स्पर्धेत प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या (अभिमत विद्यापीठ) डॉ. बाळासाहेब विख पाटील मेडिकल कॉलेजच्या संघाने आपला दबदबा निर्माण केला आहे. या स्पर्धेत प्रवराच्या मुलींच्या संघाने सलग तीन विजयांची नोंद करत प्रथम क्रमांकाचे भव्य पारितोषिक पटकावले, अशी माहिती क्रीडा संचालक डॉ. सुनील बुलार यांनी दिली.




मैदानावर प्रवराची हुकूमत दाखवत अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत प्रवराच्या मुलींनी लातूर मेडिकल कॉलेज, सोलापूर मेडिकल कॉलेज आणि यजमान डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज (जळगाव) यांच्या संघांना पराभवाची धूळ चारली. उत्कृष्ट समन्वय आणि चपळाईच्या जोरावर मुलींच्या संघाने अजिंक्यपद आपल्या नावावर केले.

या स्पर्धेत वैयक्तिक कामगिरीतही प्रवराच्या खेळाडूंनी चमक दाखवली. मुलींच्या संघातून यशश्री कर्डिले हिने अष्टपैलू खेळ करत 'मॅन ऑफ द मॅच'चा किताब पटकावला. तसेच मुलांच्या गटात यश मोडक याने आपल्या आक्रमक खेळाच्या जोरावर 'मॅन ऑफ द मॅच' हा बहुमान मिळवला.

या यशामागे क्रीडा संचालक डॉ. सुनील बुलार आणि क्रीडा शिक्षक नितीन गोर्डे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या देदिप्यमान यशाबद्दल प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ.राजेंद्र विखे आणि विश्वस्त ध्रुव विखे, कुलगुरू डॉ. व्ही.एन.मगरे यांनी विजेत्या खेळाडूंचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात निर्भय कन्या अभियान' अंतर्गत कार्यशाळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय त्रिमूर्तीनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळांतर्गत 'निर्भय कन्या अभियान' अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.



या कार्यशाळेनिमित्त डॉ. स्नेहल आरसुळे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थिनींना मोबाईलचा वापर मर्यादित ठेवून शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी स्त्रियांच्या अधिकारांची व सुरक्षेशी संबंधित कायद्यांची माहिती ही दिली.

कार्यशाळेचे दुसरे पुष्प प्राचार्य डॉ. संध्या भंगाळे यांनी गुंफले. त्यांनी 'मानसिक आरोग्य व्यवस्थापन व स्त्रियांचे स्वास्थ' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनुराधा गोरे होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी निर्भय कन्या अभियानाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थिनींनी शिक्षणासोबत आत्मसंरक्षण, आरोग्य जागरूकता आणि कायदेशीर हक्कांची माहिती ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. आत्मविश्वास, स्वयंशिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन यांमुळेच मुली जीवनात प्रगती करू शकतात असे त्यांनी प्रतिपादन केले.

यावेळी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.निकिता बर्गे, प्रा.अमृता देवकर, प्रा.योगिता गायकवाड, प्रा.अश्विनी औटी, प्रा.दिपाली भोसले, प्रा.नूतन वंजारे, प्रा.गायत्री ढाकिफळे, प्रा.गीता जाधव आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा डोईफोडे यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. निकिता बर्गे यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन प्रा. अश्विनी औटी यांनी मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# विखे, महाजनांची मैदानात तुफान फटकेबाजी

## बुद्धीबळाच्या पटावर ही दाखवली चुणूक





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : प्रशासकीय कामाच्या व्यापातून वेळ काढत अधिकाऱ्यांनी मैदानात गाजवलेले कसब व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुद्द मंत्र्यांनीच हातात घेतलेली बॅट... अशा अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात शासनाच्या जलसंपदा विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना लोणी येथे शानदार सुरुवात झाली. जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन व जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून खेळात सहभाग नोंदवत खेळाडूंचा उत्साह द्विगुणित केला.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या विविध क्रीडांगणांवर या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये पुरुष व महिलांसाठी क्रिकेट, कबड्डी, बुद्धीबळ व जलतरण यांसारख्या विविध खेळांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेचा शुभारंभ केल्यानंतर दोन्ही मंत्र्यांनी केवळ औपचारिक हजेरी न लावता क्रिकेटच्या खेळपट्टीवर बॅटिंगचे कौशल्य आजमावले. तसेच बुद्धीबळाच्या पटावरही काही वेळ चाल खेळत बौद्धिक कौशल्याची चुणूक दाखवली. यावेळी मंत्री महाजन आणि मंत्री डॉ. विखे पाटील यांनी कबड्डीपटू व इतर स्पर्धकांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. खेळांमुळे सांघिक भावना वाढीस लागते.

निरोगी आयुष्यासाठी खेळाची नितांत गरज आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून क्रीडा संस्कृतीला चालना मिळून प्रशासनात शिस्त व आरोग्यपूर्ण जीवनशैलीला प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

याप्रसंगी जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव (लाभक्षेत्र विकास) संजय बेलसरे, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विविध जिल्ह्यांतून आलेले खेळाडू व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशासाठी कठोर परिश्रमाची तयारी ठेवा : डॉ. मनाली कोल्हे




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : अहिल्यानगर जिल्ह्यातील पॉलीटेक्निक आणि डी. फार्मसी संस्थां मधिल मुलींच्या सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची संधी संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्नीकला मिळाली. या स्पर्धेच्या निमीत्ताने सांघिक आणि व्यक्तिगत क्रिडा कौशल्य दाखवीण्याची संधी खेळाडूंना मिळणार आहे. जिवनात खिलाडु वृत्ती ठेवा. यशासाठी कठोर परिश्रम घेण्याची तयारी ठेवा असा संदेश या क्रिडा स्पर्धा देतात. असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ स्कुलच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी केले. संजीवनी पॉलीटेक्नीकच्या प्रशस्त मैदानावर, इंटर इंजिनिअरीग डीप्लोमा स्टुडंटस् स्पोर्ट्स असोसिएशन (ई १ झोन) अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पॉलीटेक्निक व डी. फार्मसी संस्थांमधिल मुलींच्या सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धांचा प्रारंभ करताना त्या बोलत होत्या.

संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे अध्यक्षस्थानी होते . यावेळी ई १ झोनच्या प्रतिनिधी प्रा. आशा म्हस्के, प्राचार्य ए. आर. मिरीकर, जीमखाना विभाग प्रमुख नानासाहेब लोंढे आदि उपस्थित होते. स्पर्धेत सहभागी झालेल्या दोनशेहून अधिक मुलींनी व त्यांच्या संघ प्रमुखांनी या सोहळ्यास हजेरी लावली. डॉ.कोल्हे म्हणाल्या, सातत्याने केलेला सराव, शारीरिक तंदुरूस्ती, मानसिक स्थैर्य आणि तांत्रिक कौशल्य या स्पर्धांमधुन प्रकट होते. क्रीडा स्पर्धा म्हणजे आरोग्य, शिस्त, नेतृत्व, संघभावना आणि कौशल्य यांचा उत्सव असतो. प्राचार्य मिरीकर म्हणाले, संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांचा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन होता. त्या दिशेने संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची वाटचाल सुरू आहे. प्रा.आय.के. सय्यद यांनी सुत्रसंचालन तर डॉ. मोहिनी गुंजाळ यांनी आभारप्रदर्शन केले.

# लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : माजी मंत्री तसेच लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील निमगाव जाळी येथे विविध शालेय स्पर्धांचे आयोजन व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला असल्याची माहिती गावच्या लोकनियुक्त सरपंच तसेच राजहंस दुध संघाच्या संचालिका प्रतिभाताई जोंधळे यांनी दिली आहे. याबाबत सांगताना प्रतिभाताई जोंधळे म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात हे तालुक्याचे भाग्यविधाते व कुटुंबप्रमुख असून त्यांचा वाढदिवस संपूर्ण तालुका हा मोठ्या उत्साहात साजरा करत असतो. निमगाव जाळी गाव हे कायम बाळासाहेब थोरात यांच्या विचारांच्या पाठीशी भक्कमपणे असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त गावातील शाळेत वकृत्व स्पर्धा , चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व बक्षीस वितरणही करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी, पालकांनी व ग्रामस्थांनी उदंड प्रतिसाद दिला. या कार्यक्रम प्रसंगी निमगाव जाळी गावच्या लोकनियुक्त सरपंच तसेच राजहंस दूध संघाच्या संचालिका प्रतिभा जोंधळे, माजी चेअरमन रंगनाथ वदक, सुखदेव डेंगळे, रावसाहेब थेते, मोहन वदक, सोसायटी चे संचालक सोमनाथ जोंधळे, अशोक भोसले, गोरख वदक, तान्हाजी जोंधळे, दत्तू तळोले, संजय वदक, विद्यालयाचे प्राचार्य गागरे सर्व स्टाफ. व गावातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# विळद घाटातून भंगारात आणलेल्या स्फोटक वस्तूचा स्फोट

## श्रीरामपुरात महिला जखमी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड नंबर दोन मधील नवी दिल्ली परिसरात विळद घाट परिसरातून काही गोळे वेचून आणले होते ते गोळे फोडत असताना अचानक स्फोट झाल्याने एक महिला गंभीर भाजली आहे. घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. शहरातील वॉर्ड नंबर दोन मधील नवी दिल्ली परिसरात राहणारी अनिता नावाची महिला गावोगावी जाऊन भंगार गोळा करण्याचे काम करते. असेच काल तिने विळद घाट परिसरातून काही स्फोटक गोळे वेचून आणले होते ते गोळे फोडले की, त्यामध्ये तांबे, सीसे निघत असल्याने काही महिला ते गोळे गोळा करण्याचे काम करतात व नंतर घरी आणून सदर गोळे फोडतात असेच विळद घाट परिसरातून गोळा केलेले गोळे फोडत असताना तो स्फोट झाल्याची माहिती आहे. यामध्ये भंगार गोळा करणारी अनिता नावाची महिला जखमी झाली असून तिला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत परिसराची पाहणी केली व सदर परिसर सील केला आहे. स्फोटातील काही तुकडे तपासणीसाठी फॉरेन्सिक पथकाने हस्तगत केले असून त्याचा अहवाल आल्यानंतरच या मागचे कारण स्पष्ट होणार आहे पोलीस प्रशासनाने पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# लोह कमतरता असलेल्या ऊसाला हिराकस वापरा : डॉ. ढगे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : लोह कमतरता असलेल्या ऊसासाठी हिराकस तथा फेरस सल्फेट वापरा असे आवाहन नेवासा तालुक्याचे भूमीपुत्र कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले आहे. नेवासा तालुक्यात उसाची लागवड मोठ्या प्रमाणात असते चालू वर्षी २०२५ च्या हंगामात तीन साखर कारखाने सुरू आहेत त्यामुळे ऊस तोडणी जलद गतीने सुरू आहे. खोडव्याच्या संदर्भात कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे कृषी मंडळ अधिकारी लक्ष्मणराव सुडके यांनी पाहणी केली.

जळके खुर्द येथील ऊस उत्पादक शेतकरी तुकाराम सोलट यांच्या शेतामध्ये पांढरी माती असल्यामुळे गावठाणाच्या परिसरात अनेक ठिकाणी लोह सुक्ष्म अन्नद्रव्याची उसावर कमतरतेची लक्षणे आढळल्याचे व उसाची पाने संपूर्ण पिवळी झाल्याचे आढळले .याकरिता लोह सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत हिराकस तथा फेरस सल्फेट एकरी दहा किलो जमिनीतून मिसळून दिल्यास उसाची पाने हिरवीगार होतील व वजनात येणारी घट टाळता येईल असा सल्ला कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी दिला आहे.

# औताडे विद्यालय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित कै रघुनाथ कृष्णाजी पाटील औताडे विद्यालय माळेवाडीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरामपूर तालुका पोलीस निरीक्षक अरुण धनवडे व संस्थेचे सहसचिव जयंत चौधरी आणि गव्हर्निंग कौन्सिल सदस्य सुनील थोरात व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून विद्येची देवता माता सरस्वती व खा. गोविंदराव आदिक यांचे प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक कुंडलिक शिरोळे यांनी विद्यालयांमध्ये राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. त्यानंतर कार्यक्रमाच्या सुरुवातीला चालू शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये मिळविलेल्या बक्षीसांचे वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर विविध गुण प्रदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे शिक्षक अरुण थोरात, दादा तुपे, बाबासाहेब ठाकरे, राहुल औताडे, इसाक पठाण, कैलास हाके, राजाभाऊ चव्हाण, मयुर भागडे, योगेश गिरी आणि शिक्षिका सुनिता नागरे कल्पना राठोड आर्चना औताडे शितल अभंग सविता गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांचे कार्यक्रम बसविले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विलास कुलकर्णी व अरुण शिंदे यांनी अतिशय उत्कृष्ट प्रकारे करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. त्याबद्दल गावातील पालक, ग्रामस्थ,माझी विद्यार्थी यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका यांचे अभिनंदन केले.

# जलजीवन योजनेतील अपूर्णतेमुळे पाणीटंचाईची शक्यता...



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत जलजीवन मिशनच्या अनेक योजना कागदोपत्री पूर्ण झालेल्या दाखविल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात त्या पूर्ण झाल्या नसल्यामुळे संगमनेर तालु क्यातील काही गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये संबंधित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावेत, तसेच टँकर सुरू करताना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने पूर्व तयारी ठेवावी, अशा स्पष्ट सूचना आमदार अमोल खताळ यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

तालुक्यात आगामी काळात निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणीपुरवठा विभागाच्या वतीने कोणत्या उपाययोजना करता येतील, याबाबत प्रांताधिकारी कार्यालयात टंचाईपूर्व नियोजन आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस संगमनेर उपविभागाचे प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रशांत सिनारे, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या शाखा अभियंता शैलेजा डावखरे, जल संधारण विभागाचे उपअभियंता तसेच ग्रामपाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मागील वर्षी तालुक्यात केवळ २१ पाण्याचे टँकर सुरू होते.

मात्र सध्या तालुक्याच्या ज्या भागांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत जलजीवन योजना राबविण्यात आल्या आहेत, तसेच सायखिंडी व पठार भागातील अनेक वाड्या-वस्त्यांमध्ये शाश्वत पाण्याचा स्रोत उपलब्ध नाही. तसेच अद्याप ही काही भागांमध्ये जल जीवन योजना राबविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी पाणीटंचाई निर्माण झाल्यास तात्काळ पाहणी करून टँकर सुरू करण्यात यावेत आणि कोणत्याही प्रकारची प्रशासकीय अडचण येऊ देऊ नये. जलजीवन योजनेचे काम पूर्ण दाखवले गेले असले तरी प्रत्यक्षात नागरिकांना पाणी मिळत नसेल, तर ते अत्यंत गंभीर बाब आहे.

नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, ही प्रशासनाची जबाबदारी असून, त्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.

> ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची गरज भासेल, त्या सर्व गावांचे प्रस्ताव तत्काळ तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. टंचाईच्या काळात तालुक्या तील कोणत्याही गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याविना राहावे लागू नये, याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी. पाणीपुरवठा योजनांमधील त्रुटी तातडीने दूर करून, आवश्यक ठिकाणी त्वरित टँकर सुरू करण्यात यावेत. नागरिकांना पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे आणि तो हक्क अबाधित राहिला पाहिजे.
> **अमोल खताळ, (आमदार संगमनेर विधानसभा)**

## द • ख • ल

### महाशिवरात्रीची त्रिवेणीश्वर देवस्थान येथे जय्यत तयारी



**नेवासा** : प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या नेवासा तालुक्यातील हंडीनिमगाव येथील स्वयंभू त्रिवेणीश्वर देवस्थान प्रांगणात दि.११ फेब्रुवारी ते दि.१६ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या महाशिवरात्री उत्सवाची देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी सुरू असून बुधवार दि.११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता संत महंतांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण सोहळा होत आहे.

प.पू. ब्रम्हलिन अजानबाहु भक्त योगिराज प्रल्हादगिरीजी महाराज, ब्रम्हलीन गुरूवर्य प्रकाशगिरी महाराज व श्रीश्रीश्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवानंदगिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच महंत भास्करगिरी महाराज व महंत सुनिलगिरी महाराज यांच्या प्रेरणेने व महंत रमेशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा महाशिवरात्रोत्सव सोहळा साजरा होत आहे. धर्मधर्मध्वजारोहन कार्यक्रमाला पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन देवस्थान प्रमुख महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज त्रिवेणीश्वर भक्त परिवार व समस्त हंडीनिमगांव व सुरेशनगर ग्रामस्थांनी केले आहे.

### दिपक सोनवणेची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत बाजी



**कोपरगाव** : जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या वतीने त्रिमूर्ती शिक्षण संस्था, नेवासा फाटा येथे दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या जिल्हास्तरीय शालेय वैयक्तिक क्रीडा स्पर्धेत कोपरगाव तालुक्यातील करंजी बुद्रुक गावचा डंका वाजला आहे.

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करंजी बुद्रुक शाळेचा इयत्ता सातवीचा विद्यार्थी दिपक भाऊसाहेब सोनवणे याने गोळाफेक स्पर्धेत चमकदार कामगिरी करत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. विक्रमी कामगिरी दिपकने ११.०९ मीटर अंतरावर गोळा फेकून मैदानावर उपस्थित सर्वांच्या नजरा खेचून घेतल्या. ग्रामीण भागात खेळाच्या आधुनिक साहित्याचा आणि सुविधांचा अभाव असतानाही, केवळ जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर दिपकने हे यश संपादन केले आहे. त्याच्या या कामगिरीचे क्रीडा क्षेत्रात विशेष कौतुक होत आहे.

### निमगाव खैरी शाळेत माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात



**श्रीरामपूर** : तालुक्यातील निमगाव (खैरी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळेच्या शताब्दी वर्षानिमित्त इयत्ता ७ वी (बॅच १९७८-७९) चा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा तब्बल ४८ वर्षांनंतर उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक यादव गायधने होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक संतोष वाघमोडे उपस्थित होते. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत गुरुजन व शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रारंभी दिवंगत वर्गमित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी माजी विद्यार्थ्यांनी शाळा विकासासाठी १५ हजार रुपयांची देणगी दिली. शाळेच्या उपक्रमांत माजी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्याध्यापक वाघमोडे यांनी केले. कार्यक्रमास ग्रामस्थ, माजी विद्यार्थी व शिक्षकांची मोठी उपस्थिती होती.

### सकारात्मक दृष्टीकोन जीवन सुंदर बनवितो : प्रशांत देशमुख



**कोपरगाव** : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन हे महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध शिव व्याख्याते श्री. प्रशांत देशमुख यांनी केले. सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे चेअरमन डॉ. सुधीरजी तांबे, संचालक सीताराम पाटील वर्पे, बी. आर. सोनवणे, धनंजय देशमुख, प्रा. विठ्ठल शेवाळे, ॲड. उदय ढोमसे, प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. देशमुख यांनी शिवचरित्रातील दाखले तसेच महाराजा सयाजीराव गायकवाड व ताराबाई शिंदे यांच्या जीवनातील उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टीकोनाचे महत्त्व पटवून दिले. आवड आणि व्यवसाय एकरूप झाल्यास जीवन अधिक अर्थपूर्ण होते. गुणवत्ता, कौशल्य, श्रद्धा व हजरजबाबीपणा आयुष्य घडवितात, असे त्यांनी सांगून विद्यार्थ्यांनी रायगडाला भेट देऊन शिवचरित्र आचरणात आणावे, असे आवाहन केले. डॉ. तांबे यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदना व इतिहासाची जाणीव वाढविण्याची गरज व्यक्त केली. शिक्षणासोबत कला, सांस्कृतिक व क्रीडा गुणांचा विकास महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमात गुणवंत प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. कोमल म्हस्के व डॉ. स्वाती ठुबे यांनी केले, तर आभार प्रा. नाना गुंजाळ यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

## पान १ वरुन

### सौंदाळा झाले जातमुक्त !

सामाजिक, शैक्षणिक व नैतिक विकासासंबंधी; तसेच सार्वजनिक हिताच्या विषयांवर ठराव करण्याचा अधिकार आहे. त्या अधिकाराचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला. ग्रामसभेच्या ठरावामुळे गावांत जात, पंथ, धर्म, वंश याबाबत भेदभाव केला जाणार नाही. सर्व नागरिक समान आहेत. 'माझी जात मानव' ही भावना स्वीकारली.

आंतरजातीय विवाह होतील, त्यासाठी सर्व मदत केली जाईल. सार्वजनिक ठिकाणे, शासकीय योजना, ग्राम पंचायत सेवा, सामाजिक-धार्मिक कार्यक्रम, विवाह, सण-उत्सवात जातिभेद बंद होणार. कोणतीही जातनिहाय प्रथा, भेदभाव, बहिष्कार, अस्पृश्यता, सामाजिक अन्याय आढळल्यास ग्रामसभा/ग्रामपंचायत त्यावर तत्काळ कारवाई करेल.

सौंदळा गाव 'जातमुक्त गाव' म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसे फलक लावण्यात येतील. सोशल मीडियावर जाती भेदभावबाबत संदेश करणार नाही. कुणाला करूही देणार नाही. शासनाच्या समता व सामाजिक न्याय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, अशी माहिती सरपंच शरद आरगडे यांनी दिली.

आहिल्यानगर म्हणजेच अहमदनगर जिल्ह्यात हे गाव आहे. २०११ च्या जनगणने नुसार या गावाची लोकसंख्या ही १८०० आहे. हे गाव तंटामुक्त गाव आहे. तसा पुरस्कारही या गावाला मिळाला आहे. या गावाने नेहमीच समाजाचा आणि गावाचा विकास पाहिला आहे. त्या दृष्टीने चांगले निर्णयही केले आहेत. गावाची ही ग्रामपंचायतीला चांगली साथ लाभली आहे. त्यामुळे आतापर्यंत चांगले निर्णय झाले आहेत. त्याचे कौतूक ही संपूर्ण राज्यात झाले आहे.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. कर्जाचा बोजा आणि अपुरी मदत यामुळं शेतकऱ्यांवर मोठं संकट ओढवलं होतं. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांवरील शैक्षणिक खर्चाचा भार हलका करण्यासाठी सौंदाळा ग्रामपंचायतीनं पुढाकार घेतला होता. सौंदाळा गावातील प्रत्येक मुलीचं पालकत्व ग्रामपंचायतीने स्वीकारलं होतं. त्याचबरोबर गावात हुंडा घेणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेत हुंडा घेणारा कळवा, ५ हजार रुपये मिळवा असा ठराव ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावामुळं केवळ हुंडा प्रथा थांबवण्याबरोबरच कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठीही मदत होणार असल्याचे ग्रामपंचायतचे सरपंच शरद आरगडे यांनी सांगितले.

गावातील शाळांमध्येही राष्ट्रगीताच्यावेळी उभे राहून सन्मान करण्याचं आवाहन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केलं आहे. या निर्णयाचं गावातील नागरिकांनी स्वागत केलं असून हा निर्णय देशाच्या भवितव्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असं मत व्यक्त केलं आहे. या उपक्रमामुळं देशातील जातीयवाद संपून देश अखंड राहील आणि सर्व नागरिकांमध्ये एकता आणि समता निर्माण होईल, असं ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी सांगितलं.

ग्रामपंचायतीच्यावतीनं गावात लावण्यात आलेल्या भोंग्यावर सकाळी ठीक १० वाजता राष्ट्रगीत लागल्यानंतर शेतात काम करणारे तसंच रस्त्याने जाणारे नागरिकांच्या कानावर राष्ट्रगीत ऐकू येताच जिथे असतील तिथेच थांबून राष्ट्रगीताचा सन्मान करतात. ग्रामपंचायतीच्यावतीनं आजपासून राष्ट्र प्रथम या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आल्यानं याचं सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. हा उपक्रम राज्यातील सर्वच ग्रामपंचायतींनी राबवावा असं आवाहनही सरपंच शरद आरगडे यांनी केलं आहे.विद्यार्थ्यांना मोबाईल बंदी ते बालकामगार मुक्ती! सौंदाळा ग्रामपंचायतीने राज्यातील पहिली ग्रामपंचायत म्हणून संध्याकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत घरातील शालेय विद्यार्थ्यांकडे मोबाईल देण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. मोबाईल दिसल्यास त्या कुटुंबीयांना ५०० रुपयांचा दंड, असा ठराव करण्यात आला असून अनेकांकडून दंडही वसूल करण्यात आला आहे. तसेच बालकामगारमुक्त गाव करण्यासाठी बालकामगार दाखवा, एक हजार रुपये मिळवा, असे आवाहनही करण्यात आले होते.

## माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे संविधान ग्रुपच्या वतीने त्याग मूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती ७ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून संविधान ग्रुप, रिपाई संघटना व ग्रामस्थ या सर्वांच्या वतीने माता रमाई यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी सभापती नानासाहेब पवार, प्रगतशील शेतकरी रमेश दादा धुमाळ, अशोकचे माजी व्हा. चेअरमन बापूराव त्रिभुवन, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, माजी सरपंच चित्रसेन रणनवरे, जयकर मगर सर बापूराव शिंदे, मेजर विनोद रणनवरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे, शामराव खरात, सतीश रणनवरे, माजी ग्राम. सदस्य आप्पासाहेब रणनवरे, रवींद्र रणनवरे,राजेंद्र रणनवरे, संदीप जाधव,राजेंद्र देवळालकर, मधुकर गायकवाड,अशोक धोत्रे, लक्ष्मण लांडगे, नानासाहेब रणनवरे, स्वप्निल रणनवरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



## निधन वार्ता

### सिंधु देठे



**गणोरे** - श्रीमती सिंधु वामन देठे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मूलं एक मुलगी सुना, नातू व जावई असा मोठा परिवार आहे. विलास, विकास वामन देठे व सिमा बाळासाहेब आहेर यांच्या त्या आई होत.

## जीवन बदलायचे तर पुस्तकाशी मैत्री करा: प्रा. सावंत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कुकाणा :** जीवनामध्ये यशच्या शिखरावर पोहोचायचे असेल तर चांगली मैत्री करा, महान नेत्यांच्या चरित्रामध्ये आत्मविश्वास आहे, वाचनाने मस्तक घडत असते त्यामुळे आपले जीवन बदलायचे तर पुस्तकाशी मैत्री करा असे प्रतिपादन चिलेखनवाडीचे लोकनियुक्त सरपंच व ग्रामीण साहित्यीक प्रा. भाऊसाहेब सावंत यांनी केले. भेंडा येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी ते प्रमुख अथिती म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी उपप्राचार्य भारत वाबळे हे होते.

यावेळी सावंत यांनी सांगितले आत्मविश्वासाने सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे जीवनामध्ये जिद्द ठेवावी लागते तरच आपले ध्येय साध्य करता येते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाचे उपप्राचार्य कल्याणराव रुईकर यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांसह अध्यापक अंबादास नंनवरे, मीना सदाफुले, ज्योती खरड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी मुंगसे पर्यवेक्षक आदिनाथ वावरे, पर्यवेक्षक सूर्यकांत मोरे, शिक्षक तुकाराम फटांगरे, बाळासाहेब उगलमुगले सुधाकर चव्हाण, संजय भुसारी, गणेश आरगडे, नितीन मुंगसे उपस्थित होते.



## नगर - मनमाड रस्त्यावर दररोज कारवाई तरीही वाहन चालकांकडून नियमांची पायमल्ली



आपण आपली वाहने एकेरी लेनमध्ये ठेवावी कोणतीही वाहने राँग साईडने घालू नये जेणेकरून ट्राफिक जामच्या प्रश्नाला आपणास सामोरे जावे लागेल व त्यामुळे सामान्य नागरिकांना विनाकारण त्रास होतो व आपणास दंडात्मक कारवाई सामोरे जावे लागेल तसेच आपले वाहनाचे रंगीत व काळ्या काचा काढून घ्याव्यात. वाहनधारकांनी रस्ता लवकरात लवकर होण्यासाठी प्रशासनाला व पोलिसांना सहकार्य करावे ही कारवाई दररोज सुरूच राहणार आहे.

**संजय ठेंगे**
**पोलीस निरीक्षक राहुरी.**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** शहरातून जाणाऱ्या नगर - मनमाड महामार्गाचे काम सध्या सुरू असून त्यामुळे बऱ्याच ठिकाणी वाहतूक एकेरी करण्यात आली असल्याने वाहतूक मंद गतीने सुरू आहे त्यामुळे काही वाहनधारक आपली वाहने राँग साईडने घालून वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा आणि आहेत त्यामुळे दोन्ही बाजूला वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. राँग साईडने वाहने घालणाऱ्या वाहनधारकांवर राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिसांनी काल दिनांक ७ फेब्रुवारी रोजी रंगीत काचा असलेल्या आणि राँग साईडने वाहने घालणाऱ्या ३७ वाहन धारकांवर दंडात्मक कारवाई करून त्यांच्याकडून २३,१५० रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्यापैकी काळ्या काचा, रंगीत काचा वाहन चालकांच्या ५ वाहनांवर कारवाई करून २५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सदरची कारवाई सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, सोमनाथ वाकचौरे अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर, जयदत्त भवर उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे राहुरी पोलीस स्टेशन व वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड पोलीस हवालदार संतोष ठोंबरे , रमेश दरेकर, बापू फुलमाळी केली आहे.

## ब्रिटिशकालीन पोलीस वसाहत बेकायदेशीरपणे पाडली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या श्रीगोंदा शहरात धक्कादायक प्रकार समोर आला असून, श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या पश्चिम बाजूस असलेली ब्रिटिशकालीन पोलीस वसाहतीची इमारत कोणतीही शासकीय परवानगी न घेता पाडून जमीनदोस्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या इमारतीचे मौल्यवान दगड, माती तसेच इतर साहित्यही घटनास्थळावरून गायब झाल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. श्रीगोंदा शहरात वडाळी रोड लगत जुनी पोलीस वसाहत होती. ही इमारत शासनाच्या मालकीची असतानाही दिवसाढवळ्या काही अज्ञात व्यक्तींनी ती पाडल्याचा आरोप होत आहे. नियमानुसार कोणतीही सरकारी इमारत पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गृह विभागाची रीतसर परवानगी आवश्यक असते. मात्र, या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करत बेकायदेशीरपणे हे कृत्य करण्यात आले आहे. या प्रकरणाबाबत वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित विभागाकडे विचारणा केली. मात्र, विभागातील अधिकारी स्पष्ट बोलण्याचे टाळत असून एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. शासकीय मालमत्तेची अशा प्रकारे चोरी होणे आणि त्यावर अधिकारी गप्प राहणे यामागे मोठे संगणमत तर नाही ना? असा संशय व्यक्त केला जात आहे.



## अवैध दारू अड्ड्यावर छापा, महिलेवर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कारवाई राहुरी पोलीस पथकाने गावठी दारू अड्ड्यावर कारवाई करून मुद्देमाल जप्त करून एका महिलेला ताब्यात घेतले आहे.

या घटनेतील हकीकत अशी की,राहुरी तालुक्यातील दत्तनगर, राहुरी फॅक्टरी परिसरात अवैध दारूविक्री करणाऱ्यां विरुद्ध पोलिसांनी मोठी कारवाई केली. राहत्या घराच्या भिंतीच्या आडोशाला बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टीची दारू बाळगणाऱ्या एका महिलेला राहुरी पोलिसांनी रंगेहात पकडले असून तिच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दुपारी ११.४५ च्या सुमारास राहुरी पोलीस ठाण्याच्या पथकाने शहरातील दत्तनगर येथे छापा टाकला. या कारवाईत आरोपी संगीता संदीप गायकवाड, वय ३६ वर्षे, हिच्या ताब्यातून प्रत्येकी १०० रुपये किमतीचे १० लिटर गावठी हातभट्टीचे प्लास्टिक कॅन जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ हजार रुपये इतकी आहे.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके हे करीत आहेत.

## परिक्षेच्या काळात वीजेचे भारनियमन बंद करा : योगेश पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर -** तालुक्याच्या ग्रामीण भागात सकाळी ६ ते ८ यावेळेत सुरु असलेले वीजचे भारनियमन हे इयत्ता दहावी व बारावीच्या परिक्षेच्या काळात त्वरीत बंद करण्याची मागणी वडाळामहादेव येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश पवार यांनी महावितरणकडे केली आहे.

पवार यांनी निवेदनात म्हटले की, तालुक्याच्या ग्रामीण भागात महावितरणकडून सकाळी ६ ते ८ यावेळेत गेल्या अनेक दिवसांपासून वीजेचे भारनियमन करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. अनेकदा हे भारनियमन थांबविण्याची मागणी करण्यात आली, मात्र महावितरणने हे भारनियमन सुरुच ठेवले आहे.

मात्र सध्या दहावी व बारावीच्या परिक्षेचा काळ असल्याने विद्यार्थ्यांना सकाळी अभ्यास करणे अवघड झाले आहे. सकाळी चांगला अभ्यास होतो, म्हणून विद्यार्थी हे पहाटेच्या अभ्यासाला प्राधान्य देतात. मात्र भारनियमनामुळे विद्यार्थ्यांना सकाळचा अभ्यास करण्यात अडचणी येत आहे. वीजेमुळे अनेक विद्यार्थी हे रात्री उशिरापर्यंत जागरण करुन आपला अभ्यास करत आहेत. त्यामुळे महावितरणने विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा विचार करुन हे भारनियमन तातडीने थांबविण्याची मागणी पवार यांनी केली आहे.


CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME
ZWHARBI MADHAR SHAIKH
(IN BIRTH CERTIFICATE)
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
ZOHARABEE MAHEBOOB PATHAN
(AADHAR NO. 8352 1301 9226)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
BEED
PLACE: BEED DATE : 07/02/2026


## साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील चोथे वस्ती येथे वेदमंत्रांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात शुक्रवारी महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अण्णासाहेब चोथे तसेच चोथे वस्ती परिसरातील भाविकांनी संकल्प केलेल्या साई मंदिराचे काम पूर्णत्वास आले. त्यानिमित्ताने प्राणप्रतिष्ठा सोहळा आनंदात पार पडला. वेदशास्त्र संपन्न प्रकाश नवले गुरु कणगर यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल कुलकर्णी, राजेंद्र देशपांडे, विश्वास क्षीरसागर व मंगेश कुलकर्णी यांच्या वेदमंत्रांच्या गजरात पूजा विधीवत पार पडली. साई मंदिर हे केवळ पूजा-अर्चेचे स्थान नसून समाजाला एकत्र आणणारे व संस्कार देणारे केंद्र असल्याचेही त्यांनी नमूद केले. साईबाबांच्या कृपेने येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला शांती व समाधान लाभावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी तनपुरे साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, प्रेरणा परिवाराचे अध्यक्ष सुरेश वाबळे, कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर कोळसे आदी मान्यवर उपस्थित होते.



## मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपाकडून रितू तावडे

### शिवसेनेचे संजय घाडी यांची उपमहापौरपदासाठी घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुंबई मनपाच्या महापौरपदी भाजपकडून रितू तावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुंबईच्या उपमहापौरपदी शिंदेसेना शिंदे गटाकडून संजय शंकर घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. पुढील सव्वा वर्षांसाठी घाडी उपमहापौर असणार आहेत. भाजपकडून रितू तावडे आणि शीतल गंभीर यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा होती, पण रितू तावडे यांनी बाजी मारली. मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहे. ११ फेब्रुवारी मुंबई मनपा महापौर निवड होणार आहे. रितू तावडे या भाजपच्या मुंबईमधील पहिल्या महिला महापौर असणार आहेत.

> ''मुंबईची महापौरपदी निवड झाली असली तरी मुंबईची सेवक म्हणून काम करणार आहे. महापौरपद कोणाला मिळणार याची उत्सुकता सर्वांना होती. मुंबईच्या हितासाठी सर्व नगरसेक निवडून गेले आहेत. सभागृहाची गरिमा ठेवून मुंबईच्या हितासाठी पक्षभेद विसरुन निर्मळ आणि प्रामाणिक काम करावं, अशी माझी अपेक्षा आहे. ''
>
> \- रितू तावडे



रितू तावडे या भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका आहेत. २०१२ मध्ये प्रभाग क्रमांक १२७ मधून विजय मिळवला होता. २०१७ मध्ये घाटकोपरमध्ये प्रभाग क्रमांक १२१ मधून पहिल्यांदा निवडून आल्या होत्या. यानंतर २०२५ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३२ मधून विजय मिळवला आहे. त्यांनी मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. त्या महापौर पदाच्या प्रबळ दावेदार मानल्या जात होत्या. दुसरीकडे, मुंबई मनपामध्ये शिवसेना शिंदे गटाचा उपमहापौर असणार आहे. शिंदे गटाकडून संजय घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. दरम्यान, शिंदे गटाकडून मुंबईत सुद्धा पदांची खांडोळी पायंडा कायम ठेवला आहे. संजय घाडी यांना सव्वा वर्षांचा कार्यकाळ असेल, अशी घोषणा शिंदे गटाचे नेते राहुल शेवाळे यांनी केली.

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२८ ३८० ३३५ | १-० | १९० २८० २४४ | जोड ०२-१८-३० ३५-६० |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९ २४८ २२० | ४-६ | १५० १६९ ११४ | जोड ४१-०६-९२ ७८-४५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १८० २८९ ३८८ | ९-२ | १३५ २४६ ६५० | जोड ९२-४२-१३ ८०-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# घोड-हंगा नदीकाठी हातभट्टीवर कारवाई

## १.९५ लाखांचा मुद्देमाल नष्ट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीतील बेलवंडी व माठ गाव परिसरात बेकायदेशीर हातभट्टी दारू निर्मितीवर पोलिसांनी मोठी धडक कारवाई करत अवैध दारूच्या अड्ड्यांवर घाव घातला आहे. घोड नदी व हंगा नदीच्या पात्रालगत सुरू असलेल्या हातभट्टीच्या भट्ट्यांवर छापा टाकून कच्चे रसायन, तयार हातभट्टी दारू व साहित्य असा एकूण १ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला.

माठ व बेलवंडी गावात हातभट्टीची दारू तयार होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर बेलवंडी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत माठ येथील दीपक भास्कर पवार, रामदास प्रकाश पवार, अंकुश तानाजी पवार, संतोष तानाजी पवार तसेच बेलवंडी येथील संजय शंकर पवार व गोरख पांडुरंग पवार हे हातभट्टी दारू तयार करत असल्याचे निष्पन्न झाले.ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार यमगर, आवटी, दहिफळे, महिला पोलीस नाईक सुरेखा वलवे, पोलीस कॉन्स्टेबल फिरोज तांबोळी व विनोद पवार यांच्या पथकाने केली.



### नदीकाठावरच भट्ट्या सुरू असल्याने धोका

घोड व हंगा नदीच्या पात्रालगत हातभट्टी चालू असल्याने पर्यावरणाला धोका, सार्वजनिक आरोग्यावर परिणाम आणि तरुण पिढीच्या भवितव्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता होती. पोलिसांनी वेळीच कारवाई करत हा धोका टाळला आहे.

त्यामुळे हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. बेकायदेशीर धंद्यांवर शून्य सहनशीलता हीच पोलिसांची भूमिका असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

# कोकणगाव खून प्रकरणात नातेवाईकांचे आमरण उपोषण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील कोकणगाव येथील निघृण खून प्रकरणात न्याय न मिळाल्याने संतप्त नातेवाईकांनी आता थेट आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आमरण उपोषण करण्यात येणार असून, पोलिस तपासावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपींना अद्याप अटक न करता त्यांना अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात असल्याचा गंभीर आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. तर चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या काही संशयितांना कोणतीही ठोस कारवाई न करता सोडून देण्यात आल्याने चोर मोकाट आणि निरपराध अडकवले जात आहेत अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दि १६ जानेवारी २०२६ रोजी कोकणगाव येथे भाऊसाहेब नामदेव रजपूत यांचा सशस्त्र हल्ल्यात निर्घृण खून करण्यात आला. या हल्ल्यात महेश चव्हाण, शैला चव्हाण, मनसुख चव्हाण, आयुब भोसले व त्यांचे इतर साथीदार प्रत्यक्ष सहभागी असल्याचा आरोप असूनही अद्याप मुख्य आरोपी मोकाट असल्याने नातेवाईकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण आहे.घटनेनंतर उपोषणकर्ते व त्यांचे कुटुंबीय सतत धमक्यांच्या छायेत असून, रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तींकडून दगडफेक होत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे जीवितास आणि मालमत्तेस गंभीर धोका निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या

सर्व मुख्य व इतर आरोपींना तात्काळ अटक करावी. पोलिसांनी सोडून दिलेल्या व्यक्तींनाही गुन्ह्यात आरोपी करावे. उपोषणकर्ते व त्यांच्या कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे. न्याय न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे. कोकणगाव खून प्रकरण आता केवळ गुन्हा न राहता, पोलिस तपासाच्या विश्वासार्हतेची कसोटी ठरत आहे.

## द•ख•ल

### स्व. अजितदादांना पाथर्डीत सोमवारी सर्वपक्षीय श्रद्धांजली

**पाथर्डी** : स्व. अजितदादा पवार यांच्या अचानक जाण्याने राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. सर्वसामान्य जनतेमध्येही दुःखाची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्याच्या वतीने स्व. अजितदादा यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सर्वपक्षीय शोकसभा सोमवार, दि. १० फेब्रुवारी २०२६सकाळी ९.०० वाजता लोकनेते आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालय, कोरडगाव रोड, पाथर्डी येथे आयोजित करण्यात आली आहे. या शोकसभेस पाथर्डी तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

### मायेशा फैय्याज शेख वक्तृत्व स्पर्धेत राज्यात प्रथम



**लिंपणगाव** : श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील अकरावी विज्ञान या वर्गातील विद्यार्थिनी मायेशा फैय्याज शेख हिने के.बी.रोहमारे स्मृती करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. स्पर्धेचे हे अकरावे वर्ष होते.या वक्तृत्व स्पर्धा के.जे. सोमय्या वरिष्ठ आणि के.बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालय कोपरगाव येथे संपन्न झाल्या. तिने कनिष्ठ महाविद्यालयीन गटात, अहिल्यानागर जिल्ह्यातील सहकाराचे अग्रदूत कै के जी रोहमारे(दादा) या विषयावर सादरीकरण केले आणि राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते.तिला सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा शंकर गवते यांचे मार्गदर्शन मिळाले.महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक श्री फैय्याज शेख यांची ती कन्या आहे. तिने यापूर्वी अनेक वक्तृत्व आणि वाद विवाद स्पर्धेत पुरस्कार प्राप्त केले आहेत. प्राचार्य सचिनराव लगड,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सतीशचंद्र सुर्यवंशी ,उपप्राचार्य प्रा सी आर कातोरे, पर्यवेक्षक प्रा प्रवीण टकले,सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर सेवक यांनी तिचे अभिनंदन केले आहे.तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### शहरात तरुणीचा विनयभंग, अ‍ॅट्रॉसिटी दाखल

**नगर** : शहराच्या स्टेशन रोड परिसरातील एका मोबाईल शॉपीमध्ये मोबाईलचे खाते सुरू करण्यासाठी गेलेल्या २० वर्षीय तरुणीचा विनयभंग करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला तात्काळ ताब्यात घेतले आहे. दुकानाच्या गल्ल्यावर बसलेल्या संजुर मल्लुद्दीन आलम शेख याने तरुणीकडे भ्रमणध्वनी क्रमांकाची मागणी केली. तरुणीने नकार दिला असता आरोपीने तिचा विनयभंग केला. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी विनयभंग आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रॉसिटी) गुन्हा नोंदवला आहे.

### पैशांच्या वादातून दुकानदाराला मारहाण, दुकानाची तोडफोड

**अहिल्यानगर** : शहरातील स्टेशन रोड परिसरातील शिवनेरी चौकात जुन्या मोबाईलच्या पैशांच्या व्यवहारातून एका व्यापार्याला बेदम मारहाण करण्यात आली. आरोपींनी बेकायदेशीरपणे दुकानात शिरून तोडफोड केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजूर मलुद्दीन आलम शेख यांचे स्टेशन रोडवर सुपर फाईन मोबाईल शॉपी नावाचे दुकान आहे. दि. ६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी एका मुलीने त्यांच्याकडून २२०० रुपयांना जुना मोबाईल खरेदी केला. मात्र, पूर्ण पैसे न देता ती निघून गेली. काही वेळाने ती परत आली आणि पैशांवरून वाद घालू लागली. वादाचे रूपांतर भांडणात झाले आणि मुलीने फोन करून आपल्या नातेवाईकांना बोलावून घेतले.काही वेळातच आरोपी भाऊसाहेब लोखंडे, सुनिता लोखंडे, रवी लोखंडे आणि राज लोखंडे यांच्यासह तीन अनोळखी व्यक्ती दुकानात घुसले. त्यांनी संजूर शेख यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एवढेच नव्हे तर रागाच्या भरात दुकानातील काचेचे काउंटर आणि विक्रीसाठी ठेवलेले मोबाईल फोडून मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. आरडाओरडा झाल्यामुळे घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी नाविनिष्पन्न आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# कर्जत मुख्याधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या श्रद्धांजली फलक काढताना फोटोची विटंबना झाल्याच्या घटनेमुळे कर्जत शहरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. या प्रकरणी कर्जत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अक्षय जायभाये यांच्या विरोधात शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करण्याचा सविस्तर अहवाल प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे सादर केला आहे. मंगळवारी कर्जत शहरात नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांकडून मुख्याधिकारी यांच्या आदेशाने फलक काढण्याची मोहीम राबविण्यात आली. या दरम्यान दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे श्रद्धांजली फलकही काढण्यात आले. जेसीबीच्या साहाय्याने फलक हटविताना अजित पवार यांच्या छायाचित्राचे नुकसान झाल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले.

या घटनेचे तीव्र पडसाद कर्जत शहरासह तालुक्यात उमटले. बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वपक्षीय नेत्यांनी रास्तारोको आंदोलन करत मुख्याधिकारी यांच्या बडतर्फीची मागणी केली. सुमारे दोन तास चाललेल्या आंदोलनामुळे शहरात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली होती. प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी वस्तुस्थितीची चौकशी करून तथ्य आढळल्यास योग्य कार्यवाहीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर प्रांताधिकारी पाटील यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे की, श्रद्धांजली फलक काढताना जनभावनांचा आदर करणे आवश्यक होते. मात्र ही खबरदारी न घेतल्याने परिस्थिती चिघळली. व्हायरल व्हिडिओ आणि आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या चित्रीकरणात फलक काढताना फोटोचे नुकसान झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून येते. मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्याने वस्तुस्थिती स्पष्ट होण्यास अडचण आली. मुख्याधिकारी यांनी माध्यमांद्वारे दिलगिरी व्यक्त केली असली तरी कर्मचाऱ्यांना योग्य सूचना न देणे ही गंभीर कसूर असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अहवालात यापूर्वी घडलेल्या तीन घटनांचाही उल्लेख करण्यात आला आहे. महापुरुषांच्या प्रतिमांबाबत झालेल्या वादातून १ नोव्हेंबर २०२५ रोजी कर्जत बंद ठेवण्यात आला होता. तसेच अतिक्रमण कारवाईदरम्यान द्वेषपूर्ण कार्यवाही केल्याच्या आरोपांमुळेही तणाव निर्माण झाला होता. या सर्व घटनांतून मुख्याधिकारी यांच्याविरोधात सर्वसामान्य नागरिकांमध्ये रोष असल्याचे स्पष्ट होत असल्याने त्यांच्या विरोधात शिस्तभंग कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

# खो-खो व कबड्डीमध्ये इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थीनींचे यश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : संजिवनी पॉलिटेक्निक, कोपरगाव येथे आंतरमहाविद्यालयीन खो-खो व कबड्डी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थीनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत खो-खो व कबड्डी या दोन्ही क्रीडाप्रकारांत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धा दि. ६ फेब्रुवारी रोजी संपन्न झाल्या. अंतिम फेरीत गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक अहिल्यानगर या बलाढ्य संघाला पराभूत करत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या संघांनी आपले वर्चस्व सिद्ध केले. संघभावना, अचूक रणनीती आणि दमदार खेळाच्या जोरावर विद्यार्थीनींनी प्रेक्षकांची मने जिंकली.

कबड्डी संघातून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेले कम्युनिकेशन विभागातून ढवळे अनुजा, कारंडे सुप्रिया (कर्णधार), गिरमकर पूर्वी, हिरडे स्नेहल, कातोरे प्रतीक्षा कॉम्प्युटर विभागातून थोरात श्रेया, केकन सुहानी, सांगळे कल्याणी, दळवी अनुराधा, मदने वैष्णवी सिव्हिल विभागातून थोरात सृष्टी खो-खो संघातून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेले कम्युनिकेशन विभागातून मांडगे अनुजा (कर्णधार) कॉम्प्युटर विभागातून जगताप ऐश्वर्या, सरोदे सृष्टी, पवार दीक्षा, जगताप कोमल, इथापे तनुजा, महारनूर कुसूम, सकट उषा, चोरमले तनुश्री, पंधरकर दीप्ती, सांगळे कल्याणी, शेवाळे वैष्णवी या उल्लेखनीय यशामुळे इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या खो-खो व कबड्डी संघांची १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करून पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या आहेत. या विजयामुळे संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे.

# लोकसाहित्यामध्ये संस्कृती व संस्कारांचा सुरेख मिलाप : भास्कर हांडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : संस्कृती आणि संस्कार यांचा उत्तम मिलाप लोकसाहित्यामध्ये आढळतो. संस्कारांचे संस्करण होणे काळाची गरज असून त्याचा थेट परिणाम मानवी मनावर होत असतो, असे प्रतिपादन ख्यातनाम चित्रकार, शिल्पकार, कवी व संशोधक भास्कर हांडे (हॉलंड) यांनी केले.




दादा पाटील महाविद्यालयात मराठी, हिंदी व इंग्रजी विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आधुनिक परिस्थितीत लोककला, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती : आव्हाने आणि संधी' या आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. भास्कर हांडे यांनी विज्ञानाची कास, संतसाहित्याची शिकवण, मराठी संस्कृती, लोककला, लोकनाट्य व लोकसाहित्य यांचा शिक्षणातून परिचय होत असल्याचे सांगितले. भाषा हा लोकसाहित्याचा महत्त्वाचा भाग असून संस्कृतीमध्ये भाषा व कला यांचा समावेश होतो. संस्कृती काळानुरूप बदलत राहते.

ओव्या, अभंग आजही जनमानसात रुजलेले असून दानव, मानव व देव या सगळ्या माणसाच्या कृतींचेच रूप असल्याचे त्यांनी नमूद केले. या परिषदेस दैनिक लोकमतचे निवासी संपादक सुधीर लंके, डॉ. सदानंद भोसले, डॉ. सुहास निंबाळकर, डॉ. एकनाथ मुंढे, डॉ. सुधाकर शेलार आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय नगरकर होते. सकाळच्या सत्रात कवी-गीतकार व अभिनेते बाबासाहेब सौदागर यांनी 'हिरव्या ऋतूंचा रंगमहाल : लोकगीतांकडून चित्रपट गीतांकडे' या विषयावर नांदी सादर केली.

यावेळी कोपरगावचे छबुराव सुपेकर यांनी 'वासुदेव आला' तर शेवगावचे धर्मा कांबळे यांनी 'किंगरी वादन' सादर केले. सुधीर लंके म्हणाले की, लोककला, लोकसाहित्य व लोकसंस्कृती या बंदिस्त नसून जिवंत प्रवाह आहेत. संस्कृती ही केवळ स्मारकांपुरती मर्यादित नाही. लोककलावंतांना आज अनेक आव्हानांचा सामना करावा लागत असून लोककला व लोकसंस्कृतीचा राजकारणात चुकीचा वापर होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, डॉ. मधुमती कुंजल यांनी 'मॉरिशसमधील लोककला व संस्कृती' या विषयावर आभासी पद्धतीने मार्गदर्शन केले.

मॉरिशस हा बहुसांस्कृतिक देश असून भारतीय सण, भाषा व परंपरा तेथे आजही जपल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदेचे प्रास्ताविक डॉ. संदीप पै यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. राम काळे यांनी केले.

# मोबाईल, टीव्ही व्यसनाला बसणार आळा

## राहुरी नगर परिषदेचा अभिनव उपक्रम! सायंकाळी सात वाजता वाजणार भोंगा

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : सध्याच्या युगात मोबाईलचा अति वापर, टीव्ही, सोशल मीडिया व इतर व्यसनाच्या सवयी यामुळे आपली तरुण पिढी बऱ्याच प्रमाणात भरकटलेली दिसून येत आहे. त्यामुळे पालक व मुलांमध्ये संवाद राहिला नाही लहान मुलानां चांगल्या व वाईट गोष्टींमधील फरक सांगायला व त्यांच्यापाशी बसायला कुणाला वेळच उरला नाही. या सर्व गोष्टीला जबाबदार आपण स्वतः पालक आहोत . पालक म्हणून आपल्या सर्वांची जबाबदारी आहे कि, आपल्या कडून या सवयीनां वेळीच आवर घातला पाहीजे.




या सर्व गोष्टींना स्मरून राहुरी नगरपरिषदेने एक अभिनव उपक्रम अंतर्गत नुकत्याच झालेल्या सभेत एकमताने हा विषय मंजूर करण्यात आला आहे.त्यामध्ये सायंकाळी ७ वा. नगरपरिषदेचा भोंगा वाजल्यानंतर सर्व पालकांनी आपल्या घरातील टिव्ही व इतर मनोरंजनाची माध्यमे बंद करावयाची आहेत.व त्यानंतर मुलांना आपल्या घरातच अभ्यासासाठी बसावयाचे आहे. आणि पालकांनी स्वतः घरात थाबुंन पुस्तकांचे वाचन करणे , मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, त्यांच्याशी संवाद साधणे कुटुंबाला वेळ देणे आवश्यक असून अशा प्रकारे जर नित्यक्रम ठेवला तर पुढची पिढी निश्चितच योग्य वळणावर जाईल त्यामुळे हा उपक्रम राबविल्यास समाजात वेगळा संदेश निर्माण होईल. व त्यानंतरच्या दीड तासानंतर ठिक रात्री ८.३० मिनिटांनी दुसरा भोंगा वाजल्यानंतर पुर्ववत आपल्या कामासाठी वेळ दिला तरी चालेल.

अशा आशयाचा हा निर्णय आज जरी कठोर वाटत असला तरी पुढच्या पिढीला घडविण्यासाठी अशाप्रकारचे योग्य निर्णय घेण्याची आपल्यावर वेळ आली आहे . तरी सर्व पालक वर्ग या गोष्टीचा काटेकोर अवलंब करतील व पालिकेच्या निर्णयाला पाठिंबा देतील ही अपेक्षा नगर परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

# बोलत नसल्याच्या रागातून नृत्यांगनेवर कोयत्याने हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड तालुका** : तु माझ्याशी फोनवर का बोलत नाहीस? माझा नंबर ब्लॉक का केला? या कारणावरून एका तरुणाने नृत्यांगना असलेल्या तरुणीवर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना जामखेड शहरात घडली. या हल्ल्यात संबंधित महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गायत्री तुषार सावंत (वय २६, व्यवसाय नृत्यांगना, मूळ रा. वाघोली, जि. पुणे, सध्या रा. तपनेश्वर गल्ली, जामखेड) ही आपल्या मैत्रीण मनिषा प्रकाश जावळे हिच्यासोबत जामखेड येथे वास्तव्यास आहे.

आरोपी राहुल अशोक कचरे (रा. खळेगाव, ता. गेवराई, जि. बीड) याच्याशी तिचे मागील पाच वर्षांपासून मैत्रीचे संबंध होते. मात्र २०२४ पासून हे संबंध तुटले होते. यापूर्वीही फिर्यादी महिलेने आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. गुरुवारी (दि. ५ फेब्रुवारी २०२६) रात्री आरोपीने गायत्री सावंत हिला फोन करून प्रेमाची भाषा करत धमकी दिली होती. फोनवर बोलली नाही तर तुला मारून टाकीन, अशी धमकी देताच फिर्यादीने फोन कट केला. त्यानंतर शुक्रवारी (दि. ६ फेब्रुवारी २०२६) पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास आरोपी तपनेश्वर गल्लीतील तिच्या राहत्या ठिकाणी गेला. मैत्रीण मनिषा बाल्कनीत गेली असताना आरोपी तिथे दडून बसला होता. नंतर तो रूममध्ये शिरला. त्याच्या हातात कोयता होता. तु माझ्याशी का बोलत नाहीस? नंबर का ब्लॉक केला? असे म्हणत त्याने गायत्रीच्या हातांवर, बोटांवर व डोक्यावर कोयत्याने वार केले. यात ती गंभीर जखमी झाली.

मैत्रिणीने विनवणी केली तरी आरोपीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देऊन पलायन केले. या घटनेप्रकरणी आरोपी राहुल कचरे याच्याविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या फरार असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक वर्षा जाधव करीत आहेत.

# विजेचा खेळखंडोबा, पिके संकटात शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी** : मिरी, चिचोंडी परिसरात विजेच्या लपंडावामुळे या परिसरातील शेतकरी त्रस्त झाले असुन शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेले रब्बीचे पिक वाया जाण्याची भिती व्यक्त केली जात असुन येत्या दोन दिवसात विजेचा पुरवठा सुरळीत न झाल्यास या भागातील शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाथर्डी तालुक्यातील पश्चिम भागातील मिरी, चिचोंडी परिसरातील अनेक गावात विजेचा खेळखंडोबा झाला आहे. कधी दिवसा तर रात्रीच विज सोडली जात आहे, विज येण्या व जाण्याचे वेळापत्रकच राहिले नाही. चुकुन विज आलीच तर ती पुर्ण दाबाने येत नाही. गहु, हरभऱ्याची एक फडके भिजणे देखील अवघड झाले आहे. या परिसरात सध्या बिबट्याच्या भितीचे सावट आहे. तीन चार ठिकाणी बिबटे पकडण्यात आले आहेत.



त्यामुळे रात्री पिकाला पाणी देण्यासाठी शेतकरी शेतात जात नाहीत. डिपीत घोटाळा झाला तर फोन करुनही चार-चार दिवस लाईनमन डिपीकडे येत नाहीत. अतिवृष्टीमुळे या भागातील खरीपाची पिके वाया गेली तर विजेच्या लपंडावामुळे रब्बीची पिकेही वाया जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने या भागातील शेतकऱ्यांत तिव्र संताप व्यक्त केला जात आहे. येत्या दोन दिवसात विज पुरवठा सुरळीत झाला नाही तर तिव्र आंदोलन केले जाईल असा इशारा माजी सभापती संभाजीराव पालवे, बापुसाहेब घोरपडे, देविदास घोरपडे, मनोज भवर, गणेश तुपे, भाऊराव आव्हाड, रावसाहेब लोहकरे, भगवान फुलमाळी, विजय आव्हाड, नितीन काळे, भानुदास डमाळ, रामनाथ शिरसाठ, अंबादास ढमाले, जनार्धन गीते, राजेंद्र गीते, वैभव गीते, भीमराज सोनवणे, बापुसाहेब गोरे, दिलीप गीते, उद्धव गीते, गणेश सानप, अशोक टेमकर, पप्पु शिंदे, विलास टेमकर, युवराज जोगदंड, रामेश्वर गीते, बाबाजी मेजरसह अनेक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# राज्यात शेतजमिनींच्या पोटहिश्शांची मोजणी प्रत्येक भूखंडाला मिळणार 'भू-आधार' क्रमांक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** :राज्यातील ग्रामीण भागातील शेतजमिनींचे नकाशे आणि ७/१२ उताऱ्यांमधील वर्षानुवर्षांची तफावत दूर करण्यासाठी महसूल विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने राज्यातील शेतजमिनींच्या पोटहिश्शांची प्रत्यक्ष मोजणी करून नकाशे व अधिकार अभिलेख (७/१२) अद्ययावत करण्यात येणार असून, यामुळे जमिनीविषयक वाद कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. यासोबतच प्रत्येक भूखंडाला 'भू-आधार' (णङझखछ) क्रमांक देण्यात येणार आहे.



राज्यात १८९० ते १९३० या कालावधीत पहिली भूमापन प्रक्रिया पार पडली होती. त्यानंतर १९९२ पासून डिसेंबर २०२४ पर्यंत खरेदी-विक्री, वारसाहक्क व वाटणीमुळे तब्बल २ कोटी १२ लाख ७६ हजार ४९९ नवे पोटहिश्शे निर्माण झाले. मात्र, या पोटहिश्शांची प्रत्यक्ष मोजणी न झाल्याने शासकीय नकाशे आणि ७/१२ उतारे यांचा ताळमेळ बसत नव्हता. ही अडचण दूर करण्यासाठी जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या स्तरावरून 'पोटहिस्सा मोजणीचा पथदर्शी प्रकल्प' राबविण्यात येणार आहे.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक जमिनीच्या तुकड्याला णपळीँश डरपव झरॲलशश्र खवशपींळषळलरींळेप छीलशॲ अर्थात 'भू-आधार' क्रमांक देण्यात येणार आहे. आधार कार्डाप्रमाणेच जमिनीची सर्व माहिती एका क्रमांकावर उपलब्ध होणार असल्याने पीक विमा, बँक कर्ज तसेच विविध सरकारी योजनांचा लाभ घेणे शेतकऱ्यांना अधिक सुलभ होणार आहे.

या निर्णयामुळे जमिनीच्या हद्दी व क्षेत्र निश्चित होऊन शेतकऱ्यांमधील वाद कमी होतील. ७/१२ उताऱ्याशी सुसंगत अचूक नकाशे उपलब्ध होतील. पीक विमा व नुकसान भरपाईसाठी बँकांकडे अचूक डिजिटल माहिती उपलब्ध होईल, तसेच खरेदी-विक्रीचे व्यवहार अधिक जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडतील.

या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावर अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी तर तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली समित्या कामाचा आठवड्याला आढावा घेणार आहेत. यासाठी खासगी सर्वेक्षण संस्थांचीही मदत घेतली जाणार आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनींचे हक्क अबाधित राखण्यासाठी आणि व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. नकाशे आणि ७/१२ यांचा मेळ बसल्याने ग्रामीण भागातील जमिनींचे अर्थकारण अधिक मजबूत होईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

द•ख•ल

## संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**नाझरे सुपे** : थोर समाजसुधारक, कीर्तनकार आणि लोकसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंती निमित्ताने सदाशिव पेठ येथील भरत नाट्य मंदिर येथे सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत गाडगेबाबांच्या विचारांचा जागर केला जाणार असून, यात भजन, कीर्तन आणि भारुडाचा बहारदार कार्यक्रम सादर केला जाईल. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांचे निरूपण लाभणार असून, गायिका केतकी भावे-जोशी आणि ओमकार प्रभूघाटे यांच्या गायनाने हा सोहळा रंगणार आहे.या सर्वांना यशस्वी वाद्यवृंद साथसंगत करणार आहेत. तसेच, हमीद सय्यद यांचे प्रबोधनात्मक भारूड,शाहिर बाळासाहेब मालुसकर यांची शाहिरी आणि कीर्तनकार संदीप पाल महाराज यांचे कीर्तन श्रोत्यांसाठी पर्वणी ठरेल.

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बजावला मतदानाचा हक्क

**पुणे** : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर तालुक्यात जिल्हा परिषद शाळा बोराटेवस्ती, भरणेवाडी येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

यावेळी श्री. भरणे म्हणाले, लोकशाही बळकट रण्यासाठी मतदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे लोकशाहीच्या या उत्सवात अधिकाधिक मतदारांनी सहभागी होवून मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले.



## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बजावला मतदानाचा हक्क



**बारामती** : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज सकाळी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.

यावेळी श्रीमती पवार यांनी राज्यातील सर्व नागरिकांना आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत मतदान करण्याचे आवाहन केले.

## शिरूर तालुक्यात मतदानाचा टक्का वाढला: वाढलेला टक्का कोणाच्या पथ्यावर पडणार ?

**कवठे येमाई** : - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये चांगली रंगत आलेली असताना शिरूर तालुक्यामध्ये बहुतांश ठिकाणी चौरंगी लढती पर्यंत चित्र असल्याने वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीचा कोणाला फायदा होणार हा प्रश्न सर्वसामान्य मतदारांना पडला आहे.



## प्रसुतीच्या काही तास आधी बजावला मतदानाचा हक्क



**दिवे प्रतिनिधी** : मतदान जनजागृतीसाठी अनेक प्रयत्न करून देखील अनेकजण मतदान करत नाहीत. मात्र प्रसूतीला काही तास बाकी असताना एका गर्भवती महिलेने मतदान करून आदर्श मतदार असल्याचे दाखवून दिले आहे. दिवे येथील हर्षदा अतुल काळे झेंडे या गर्भवती महिलेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हर्षदा यांचे ९ महिने ९ दिवस पूर्ण झाले असून अवघ्या काहि तासात त्यांची प्रसूती होणार आहे परंतु अशाहि परिस्थितीत त्यांनी मतदानाचा हक्क बजावला व आपले बंधू साहिल झेंडे यांच्या समवेत थेट दवाखाना गाठला...... फोटो ओळ.... दिवे ता. पुरंदर येथे मतदानाचा हक्क बजावलेल्या गर्भवती हर्षदा काळे समवेत ग्रामविकास अधिकारी काशिपती सुतार व आशासेवीका

# परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता. १२ वी. क्क्ष्ठउ परीक्षा) आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी. एसएससी परीक्षा) १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते १८ मार्च २०२६ रात्री ८ वाजेपर्यंत पुणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा केंद्रावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, गैरप्रकार होऊ नये, परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याकरीता जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मनाई आदेश जारी केले आहे.

पुणे ग्रामीण जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षाकेंद्राच्या परिसरात व त्यासभोवतालच्या १०० मीटर परिसरात इतर कोणत्याही व्यक्तींना परीक्षा केंद्रावर प्रवेश करण्यास मनाई करण्यात आले आहे. तसेच परीक्षा केंद्राचे परिसरात दोन किंवा दोन पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करीत आहे. या केंद्रावर परीक्षेस बसलेले परीक्षार्थी, परीक्षेसाठी नेमलेले अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा अधिकारी यांना आदेशातून सूट देण्यात आली आहे.

परीक्षा केंद्राच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरातील सार्वजनिक टेलीफोन, एसटीडी,आयएसडी,बुथ, फॅक्स केंद्रे, झेरॉक्स सेंटर्स,ई-मेल इंटरनेट सुविधा, लॅपटॉप,मोबाईल,प्रसारमाध्यमे अथवा तत्सम संपर्क साधने बंद ठेवावीत. परीक्षा केंद्रांवर मोबाईल, वायरलेस सेट, ट्रॉझिस्टर, रेडिओ, कॅलक्युलेटर, लॅपटॉप परिक्षा केंद्रावर जवळ बाळगण्यास व परिसराचे १०० मीटर सभोवतालच्या परिसरात वापरण्यास या आदेशान्वये मनाई करण्यात येत आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशाचे कोणत्याही व्यक्तीने उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रमाणे दंडनीय पात्र राहतील असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# बालविवाहमुक्त भारतासाठी जुन्नरला सखोल जागरुकता मोहीम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा** : वनविभाग जुन्नर येथे १०० दिवसांसाठी बालविवाह मुक्त भारतासाठी सखोल जागरुकता मोहीम मोठया उत्साहात यशस्वीरित्या पार पडले यावेळी जिल्हा न्यायाधीश, तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समितीचे एस.बी. शेलार जुन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवराय संकुल बारव जुन्नर येथे पार पडले. यावेळी दिवाणी व फौजदारी न्यायाधिश सपना घुले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले-

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार कायदेविषयक शिबीर व महिला आणि बालविकास मंत्रालय आयोजित ४ डिसेंबर २०२५ पासून १०० दिवसांसाठी बालविवाह मुक्त भारतासाठी सखोल जागरुकता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते- या शिबीरात जुन्नर तालुका



वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्षा निलीमा शेरकर सचिव पुराणिक नलावडे, तबस्सुम पठाण,सलमा सय्यद,रणजित भगत,विनोद खंडागळे, मंजिरी कोल्हे, राजेंद्र कोल्हे, समकित नानावटी,करण खंडागळे, तय्यब पठाण तसेच जुन्नर तालुका विधी सेवा समिती, समन्वयक प्रशांत मोरतळे तसेच परिविक्षाधिन उपवनसंरक्षक,लोकेश पाटील, वनविभाग जुन्नर स्मिता राजहंस, प्रदिप चव्हाण, सोनल भालेराव वनपाल कळंब वनविभाग जुन्नर तसेच जुन्नरचे महिला वनविभाग महिला व पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक न्यायालयीन कर्मचारी प्रशांत मोरतळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनसंरक्षक स्मिता राजहंस यांनी मानले. आभार वनपाल सोनल भालेराव यांनी मानले. सदर १०० दिवसांसाठी बालविवाह मुक्त भारतासाठी सखोल जागरुकता मोहीम व कायदेविषयक शिबिर मोठया उत्साहात यशस्वीरित्या पार पडले.

# १०६ वर्षांच्या आजीने बजावला मतदानाचा हक्क

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**आळेफाटा** : लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदान हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असा संदेश देत १०६ वर्षांच्या आजीने मतदारांनामतदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.सोनाबाई सबाजी दांगट (वय १०६) रा.पिपंळवंडी (दांगट वाडी )ता.जुन्नर असे या आजींचे नाव आहे.

वाढत्या वयामुळे येणाऱ्या अडचणींवर मात करत या आजींनी मतदानाचा हक्क बजावला आणि समाजासमोर एक आदर्श ठेवला.

मतदान ही केवळ प्रक्रिया नसून देशाच्या भविष्यासाठीची जबाबदारी आहे. असे मत व्यक्त करत त्यांनी तरुण पिढीला मतदान करण्यासाठी विशेष आवाहन केले. अनेक वेळा उदासीनतेमुळे मतदान टाळले जाते मात्र लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मत हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आजींच्या या कृतीने मतदान केंद्रावर उपस्थित नागरिक, अधिकारी आणि तरुण मतदार प्रेरित झाले. वय, आजारपण किंवा वेळेची अडचण ही कारणे मतदान टाळण्यासाठी पुरेशी नाहीत, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

१०६ वर्षांच्या आजीचे हे आवाहन केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून दिलेले असल्याने, आगामी निवडणुकीत अधिकाधिक नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डेटा संरक्षण आणि पारदर्शकता यांचा समतोल आवश्यक : मुख्य सचिव अग्रवाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे** :-डेटा संरक्षण आणि प्रशासनातील पारदर्शकता यांचा समतोल राखणे आवश्यक असून, नागरिकांचा त्यांच्या डेटावर हक्क आणि नियंत्रण असणे ही लोकशाहीची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले. डिजिटल युगात नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सायबर सुरक्षा आणि जबाबदार प्रशासन अधिक बळकट करण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्यावतीने डिजिटल वैयक्तिक




माहिती संरक्षण (ळसळींरश्र झशऔपरश्र ृरींर झऔंशलींळेप) कायदा (ृझ्झ अलीं), २०२३ आणि त्यासंदर्भातील नियमांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे उच्चस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी, कायदेतज्ज्ञ, तंत्रज्ञान व गोपनीयता क्षेत्रातील जाणकारांनी सहभाग घेतला. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सायबर सुरक्षा, डेटा मालकी हक्क आणि डेटा संरक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले.ृझ्झ कायद्याच्या अंमलबजावणीनंतर कोणतीहीडेटा गळती थेट दंडात्मक कारवाईस कारणीभूत ठरू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. ❋मजबूत संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज- प्रधान सचिव ब्रिजेश सिंह❋ माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी ृझ्झ कायद्यामुळे डेटा संकलन, साठवण आणि वापराची पद्धत बदलावी लागेल, असे सांगितले. अनेक प्रणाली गरजेपेक्षा जास्त डेटा गोळा करतात, याकडे लक्ष वेधत त्यांनी जुन्या डेटाबेसचे पुनरावलोकन, डेटा इम्पॅक्ट असेसमेंट आणि मजबूत संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज अधोरेखित केली. विशेषतः मुले, महिला आणि असुरक्षित घटकांच्या डेटाबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आंबेगाव तालुक्याच्या पुर्व भागात सर्वच मतदान केंद्रावर शांततेत मतदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात मतदारांमध्ये मतदानाबाबत अत्यंत उत्साह दिसून आला यामध्ये महिला तसेच तरुण, तरुणी यांनी उत्साहात तेवढ्यात शांततेत मतदान केले .

घोडेगाव - पेठ, अवसरी बुद्रुक - पिंपळगाव, निरगुडसर - पारगाव, कळंब - चांडोली , शिनोली - बोरघर ,या पाच जिल्हा परिषद गटात गावागावांमध्ये मतदारांमध्ये उत्साह पहावयास मिळाला तालुक्याच्या पूर्व भागातील गावडेवाडी, अवसरी बुद्रुक, निरगुडसर, पारगाव, खडकवाडी, लोणी, धामणी व पोंदेवाडी येथे मतदारांनी सकाळपासूनच रांगा लावून उन्हाच्या आधी उत्साह पूर्ण वातावरणात मतदान केले. दुपारी मतदान केंद्रांवर मतदारांची गर्दी कमी झाली मात्र सायंकाळी पुन्हा काही प्रमाणात गर्दी वाढल्याचे पहावयास मिळाले. अनेक ठिकाणी



बुत प्रमुख मतदारांना सहकार्य करत होते. अनेक ठिकाणी मतदारांसाठी पाणी, चहा नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच विविध पक्षाचे कार्यकर्ते जेष्ठ मतदारांना घरापासून मतदान केंद्रापर्यंत गाडीने ने आण करत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी व आपला उमेदवार निवडून येण्यासाठी धावपळ करत असल्याचे पहावयास मिळत होते. खडकवाडी ता आंबेगाव येथे नवरदेवाने लग्नाच्या आधी प्रथम प्राधान्य मतदानाला दिले.

## चोरीच्या वाळूसह ५.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर,** : प्रवरा नदीपात्रातून अवैधरित्या चोरीची वाळू वाहताना पोलिसांनी डंपर पकडला असून १५ हजार रू. किंमतीची २ ब्रास वाळू यासह ५.१५ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील वांगी शिरात एका डंपरमधून अवैधरित्या वाळू चोरून नेली जात आहे. सदर माहितीनुसार तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन मध्यरात्री पाहणी केली असता वांगी येथील प्रवरा नदीच्या आडोशाला अंधारात प्रवरा नदीतून एक वाहन येताना दिसले. तेव्हा पोलिसांनी हे वाहन थांबवले असता त्या डंपरमधील चालकाने त्या ठिकाणी उडी मारून अंधाराचा फायदा घेवून तो पळून गेला. त्यानंतर डंपरमध्ये पाहीले असता १५ हजार रू. किंमतीची २ ब्रास वाळू आढळून आली.

# वैकुंठ मेहता संस्थेच्या पदवीधरांनी विश्वासार्हता आणि नवोन्मेषाच्या बळावर सहकार चळवळीचे नेतृत्व करावे : सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या अखत्यारीतील पुण्यातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेच्या (तअचछखउजच्) पदव्युत्तर पदविका व्यवस्थापन – कृषी व्यवसाय व्यवस्थापन (झत्रॄच–अइच्) या अभ्यासक्रमाच्या २०२३-२५ च्या तुकडीचा (३१) १७ वा वार्षिक दीक्षांत समारंभ आज संपन्न झाला.

या समारंभात एकूण ९३ विद्यार्थ्यांना कृषी व्यवसाय आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदविका प्रदान करण्यात आली. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे मुख्य अतिथी म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ३१ व्या तुकडीतील तीन गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि पदवी प्रदान करण्यात आली.

कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची




(अखउढए) मान्यता मिळालेली आहे, तसेच भारतीय विद्यापीठ संघटनेने (अखण) या अभ्यासक्रमाला व्यवसाय प्रशासन पदव्युत्तर पदवी (चइअ) समान दर्जा बहाल केला आहे आणि त्याला राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाची (छइअ) मान्यताही मिळालेली आहे.

संस्थेच्या प्रभारी संचालिका आणि नवी दिल्लीतील राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेच्या सचिव मीनू शुक्ला पाठक यांनी मुख्य अतिथी, मान्यवर, पालक, प्राध्यापक आणि पदवीधर विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी पार पाडलेल्या शैक्षणिक तसेच शिक्षणेतर सह-उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली. शिवनेरी सभागृहाचे उद्घाटन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्तेच झाल्याची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

मुरलीधर मोहोळ यांनीही उपस्थितांना संबोधित केले. या ३१ व्या तुकडीच्या सर्व पदवीधर विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. कठोर परिश्रम आणि शिस्तीमुळेच विद्यार्थ्यांनी हा महत्त्वाचा यशदायी टप्पा गाठला असल्याचे ते म्हणाले. भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, सहकारातून समृद्धी या संकल्पनेअंतर्गत या क्षेत्राअंतर्गत मोठ्या सुधारणा आणि प्रगती घडून येत असल्याचे ते म्हणाले.

संस्थेचे पदवीधर हे केवळ व्यवस्थापन क्षेत्रातले व्यावसायिक तज्ज्ञ नाहीत तर ते भारताच्या सहकार चळवळीचे भविष्यातील नेतृत्व असणार आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यावसायिक कारकिर्दीच्या वाटचालीत विश्वासार्हता, सहकार्य, नवोन्मेष आणि जबाबदारी ही मूल्ये जपावीत असे आवाहनही त्यांनी केले. या सगळ्यांच्या योगदानामुळे देशाचे सहकार क्षेत्र नवी उंची गाठेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्थेचे सह कार्यक्रम संचालक डॉ. डी. रवी यांनी पदक विजेत्यांच्या नावांची घोषणा केली. किशोर मनोग्ना सुंदरी यांनी या ३१ व्या तुकडीत प्रथम क्रमांक पटकावला, त्यांना भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाच्या गुणवत्ता सुवर्णपदकाने गौरवले गेले. कर्नाटी भानू श्री यांना भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि रौप्य पदकाने गौरवले गेले. पसुमती मोनिका सिरी यांना कांस्य पदकाने गौरवले गेले. संस्थेचे कुलसचिव डॉ. एस. धर्मराज यांनी या कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शनाची जबाबदारी पार पाडली.

## जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** :- पुणे जिल्हा आणि जिल्ह्यातील तेरा पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ८२७ उमेदवारांचे भवितव्य शनिवारी (दि.७ फेब्रुवारी) सायंकाळी साडेपाच वाजता मतदान यंत्रात बंद झाले आहे. यामुळे आपलं काय होणार? या भितीपोटी सर्व उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. मतमोजणी येत्या सोमवारी (दि.९ फेब्रुवारी) असल्याने सर्वपक्षीय उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. सर्व उमेदवारांसाठी शनिवार (दि. ७ फेब्रुवारी) आणि रविवारची (दि.८ फेब्रुवारी) रात्र वैऱ्याची ठरणार आहे.

तब्बल चार वर्षांच्या खंडानंतर यंदा पुणे जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी शनिवारी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान घेण्यात आले.या निवडणुकीची मतमोजणी येत्या सोमवारी (दि. ९ फेब्रुवारी) रोजी सकाळी दहा वाजता सुरू केली जाणार आहे. मतमोजणीनंतर लगेचच निकाल जाहीर केले जाणार असल्याचे जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या जिल्हा समन्वयक आणि रोजगार हमी योजना विभागाच्या उपजिल्हाधिकारी डॉ. चारुशीला देशमुख-मोहिते यांनी सांगितले.

पुणे जिल्हा परिषदेच्या एकूण ७३ आणि जिल्ह्यातील तेरा पंचायत समित्यांच्या मिळून एकूण १४६ अशा एकूण २१९ जागांसाठी ही निवडणूक घेण्यात आली. या २१९ जागांसाठी मिळून एकूण ८२७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात जिल्हा परिषदेच्या ७३ जागांसाठीच्या २९९ आणि पंचायत समित्यांच्या १४६ जागांसाठीच्या ५२८ उमेदवारांचा समावेश आहे.

# ओंकार शुगरचे ५० लाख टन गाळप पूर्ण

## १२७० कोटींची ऊस बिले वेळेत अदा



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** चालू वर्षी गळीत हंगाम मध्ये ओंकार शुगर ग्रुपने शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवत एक आदर्श निर्माण केला आहे. ओंकार ग्रुपच्या सर्व साखर कारखान्यांमार्फत तब्बल ५० लाख मेट्रिक टन ऊस गाळप यशस्वीरीत्या पूर्ण झाले असून, शेतकऱ्यांच्या ऊसापोटी १२७० कोटी रुपयांची बिले वेळेत व पूर्णपणे अदा करण्यात आली आहेत. त्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सर्वोच्च ऊस दर, काट्यावर योग्य वजन आणि वेळेवर ऊस बिल ही ओंकार शुगर ग्रुपची ओळख याही हंगामात ठामपणे जपली गेली आहे. शेतकरी जगला पाहिजे ही ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांची भूमिका केवळ शब्दांत न राहता कृतीत उतरल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

ओंकार शुगर ग्रुपच्या विविध युनिट्समध्ये आधुनिक यंत्रसामग्री, पारदर्शक व्यवस्थापन आणि नियोजनबद्ध गाळप यामुळे शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपासाठी गेला. याचा थेट फायदा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यावर झाला असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे.

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून काम करण्याची ओंकार शुगर ग्रुपची भूमिका भविष्यातही कायम राहील, असा ठाम विश्वास शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

- आमचा ऊस वेळेत गाळपाला गेला आणि बिल वेळेत खात्यात जमा झालं. त्यामुळे कर्जफेड, बियाणं आणि खताची चिंता मिटली. ओंकार ग्रुप म्हणजे शेतकऱ्यांचा विश्वास.
  **गणपत पाटील, ऊस उत्पादक, ता. श्रीगोंदा**
- काट्यावर कधीही वजनात फसवणूक झाली नाही. इतर ठिकाणी पैसे रखडतात, पण ओंकारमध्ये शब्दाला वजन असतं.
  **सुरेश भोसले, ऊस उत्पादक, ता. कर्जत**
- ऊस दर चांगला मिळाल्यामुळे यंदा शेती टिकली. 'शेतकरी जगला पाहिजे' ही घोषणा नाही, ही इथली पॉलिसी आहे.
  **रामदास चव्हाण, ऊस उत्पादक, (ता. पारनेर)**
- वेळेवर पैसे मिळाल्यामुळे घरखर्च आणि मुलांच्या शिक्षणाची चिंता राहिली नाही. ओंकार ग्रुपने आम्हा शेतकऱ्यांना सन्मान दिला.
  **महिला शेतकरी सौ. आशा पाटील, (ता. आष्टी)**

# संत सदगुरु गोदड महाराज पालखी सोहळा उत्साहात

**कर्जत :** ग्रामदैवत संत सदगुरु गोदड महाराज यांच्या १८८ व्या संजीवन समाधी व पालखी सोहळ्यानिमित्त शुक्रवारी कर्जत शहरात अभूतपूर्व असा भक्तिमय सोहळा पार पडला. यानिमित्त श्रीक्षेत्र म यंबा येथील बडेबाबा चैतन्य मच्छिंद्रनाथ महाराज तसेच मांदळी येथील आत्माराम गिरी महाराज यांच्या पवित्र पादुका प्रथमच कर्जत नगरीत दाखल झाल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.



या पवित्र पादुकांचे फटाक्यांची आतषबाजी व फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले. आकर्षक सजवलेल्या रथात पादुका विराजम ान करून ग्रामप्रदक्षिणेसाठी भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'सदगुरु गोदड महाराज की जय', 'मच्छिंद्रनाथ महाराज की जय', 'आत्माराम गिरी महाराज की जय' तसेच हरिनामाच्या गजराने कर्जत नगरी दुमदुमून गेली होती. टाळ-मृदंग, ढोल-ताशांचा गजर, भगव्या पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन चालणारे वारकरी यामुळे संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला. या मिरवणुकीत हजारो भाविक, ग्रामस्थ, विद्यार्थी, वारकरी व मानकरी सहभागी झाले होते. देहभान विसरून प्रत्येकजण भक्तिभावात तल्लीन झाल्याचे दृश्य दिसून आले. कर्जत शहरात आजवर कधीही न झालेला असा न भूतो न भविष्यती सोहळा अनुभवायला मिळाला. मिरवणुकीनंतर संत सदगुरु गोदड महाराज मंदिरात महाआरती करण्यात आली. यानंतर शिंपी आमटीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून त्याचा लाभ शहर व परिसरातील हजारो भाविकांनी घेतला.

**त्रिमूर्ती दर्शनाने भाविक भारावले :** यंदाच्या पालखी सोहळ्यात संत सदगुरु गोदड म हाराज, मच्छिंद्रनाथ महाराज व आत्माराम गिरी महाराज यांच्या पादुकांचे एकत्र दर्शन घडल्याने भाविक भक्त भावूक झाले. संपूर्ण कर्जत भक्ती, श्रद्धा व आनंदाच्या वातावरणात न्हाऊन निघाले.

द-ख-ल



## हरिगांव येथे माता रमाई जयंती साजरी

**शिरसगाव :** हरेगाव २ वाडी येथे त्यागमूर्ती माता रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित महिलांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. भावना शिनगारे यांच्या वतीने मिठाईचे वाटप करण्यात आले. त्याग मूर्ती माता रमाई जयंती निमित्त प्रभोधन हरेगाव जनहित विकास समितीचे अध्यक्ष सुनिल शिनगारे यांनी केले. माजी ग्रा. प.सदस्य मदलसा खताळ, अनिता धनेधर, सरचिटणीस युवक काँग्रेस, श्रीराम पूर तालुका भावना शिनगारे, रंजना शेळके, निर्मला भालेराव,सकू पाचवणे, आम्रपाली धनेधर, सिमरन भालेराव वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष गौतम चित्ते, संजय महाले,कडूबा धनेधर, सोमनाथ भालेराव आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करणे साठी संदीप धनेधर यांनी विशेष परिश्रम घेतले

## राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेसाठी ५ खेळाडूंची निवड

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र रायफल असोसिएशन, मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धे साठी राहाता पिस्तूल अँड रायफल शूटिंग स्पोर्ट्स असोसिएशन अंतर्गत कार्यरत लोणी येथील डी. के. स्पोर्ट्स क्लबच्या पाच खेळाडूंची नुकतीच निवड झाली. ही स्पर्धा (दि. २८) व २९ मार्च २०२६ रोजी पार पडणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंम ध्ये सिद्धांत गौरव बोर्डे, वेदांत गौरव बोर्डे, कार्तिक इंद्रभान भुसारी, साहिल सलीम बेग व जानवी प्रकाश कडू यांचा समावेश आहे. या खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, शिस्त व मेहनतीच्या जोरावर ही निवड मि ळवली आहे. या यशस्वी खेळाडूंना राहाता पिस्तूल अँड रायफल शूटिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे प्रशिक्षक तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दीपक रणपिसे व सुशांत शेळके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी नेमबाजी क्रीडा प्रकारात उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

## आंतरराष्ट्रीय परिषदेत 'बोरावके'च्या विद्यार्थ्यांचे पोस्टर प्रथम

**श्रीरामपूर, :** बीड येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 'फ्रंटियर केमिकल अँण्ड फिजिकल सायन्स फॉर एन्व्हारोन्मेंटल सस्टेनेबिलिटी' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. या परिषदेत श्रीरामपूर येथील रा.ना. बोरावके महाविद्यालयातील आदित्य वाघ व नवनाथ तनपुरे या सायन्स विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधक वृत्तीच्या जोरावर घवघवीत यश संपादन करत त्यांच्या या सादरीकरणाबद्दल या दोघांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

विद्यार्थ्यांनी या परिषदेत आपल्या पोस्टर संशोधनातून शाश्वततेचा सदेश व विघटनशिल प्लॅस्टिक निर्मिती पर्यावरण शाश्वततेसाठी रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्राचा कल्पक वापर कसा करता येईल, या संदर्भात सादरीकरण केले. त्यामध्ये पर्यावरणाचे रक्षण आणि भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वैज्ञानिक उपाययोजनांचा वापर कसा करावा याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांच्या या सादरीकरणाबद्दल या दोघांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

## नेवासा-श्रीरामपूर-संगमनेर रोडला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव द्या

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आल्याबद्दल नगराध्यक्ष करण ससाने यांचे आभार व्यक्त करत श्रीरामपूर-नेवासा-संगमनेर रोडला स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग नामकरण करा अशा मागणीचे निवेदन स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचेवतीने नगराध्यक्षांना देण्यात आले. या पार्श्वभूमीवर शहरातील आणखी एका महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधण्यात आले असून, श्रीरामपूर शहरात अद्याप स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या नावाने कोणताही रस्ता, मार्ग अथवा स्मारक अस्तित्वात नाही, ही बाब प्रतिष्ठानच्या वतीने स्पष्ट करण्यात आली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदान, राष्ट्रभक्ती आणि विचारधारेला स्मरणात ठेवण्यासाठी शहरात सावरकर यांचे नाव असणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे अमित मुथा यांनी व्यक्त केले आहे.



# १० वर्षांपासून फरार असलेला आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील पाहिजे असलेले व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिल्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत १० वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली सपोनि हरिष भोये, पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, रोहित येमुल, आकाश काळे व उत्तरेश्वर मोराळे यांचे पथक तयार करण्यात आले होते. सदर पथक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पाथर्डी पोलीस ठाण्याच्या अभिलेखातील पाहिजे फरार आरोपींची माहिती घेत असताना गु.र.नं. १६५/२०२५ भादंवि कलम ४५७, ३८० अन्वये फरार असलेला मिनीनाथ भवरे हा त्याच्या मूळ गावी आल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने तात्काळ घाटशिरस (ता. पाथर्डी) येथे जाऊन खात्री केली असता मिनीनाथ भाऊसाहेब भवरे (वय ३५, रा. घाटशिरस, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) हा आरोपी मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी पाथर्डी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडली असून पुढील तपास पाथर्डी पोलीस ठाणे करीत आहे.

# ध्येयवेड्या श्रमप्रेमींचे पर्यावरण संवर्धन कार्य पाहून समाधान वाटले : सोनवणे



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** सर्व सामाजिक संघटना कर्जत यांचे पर्यावरण संवर्धन आणि जतन याची माहिती व कार्य विविध माध्यमातून ऐकले होते. ते वाचण्यात आले होते. मात्र प्रत्यक्ष निसर्ग संवर्धनाचे काम आज पाहिले त्याचे फलित पाहून आम्ही सर्वच आश्चर्यचकित झालो आहे. ध्येयवेडे लोक काय क्रांती करू शकतात याचा प्रत्यय नक्की आला असे प्रतिपादन कुंडल (जिल्हा सांगली) वन प्रबोधिनीचे प्रशिक्षण निदेशक ए.एम. सोनवणे यांनी केले. ते कर्जत येथे वन प्रबोधिनीतील वनरक्षक प्रशिक्षणार्थी अभ्यास दौरा भेटीप्रसंगी बोलत होते. या सर्व प्रशिक्षणार्थीचे स्वागत सर्व सामाजिक संघटनेचे प्रमुख मार्गदर्शन सेवानिवृत्त वन अधिकारी अनिल तोरडमल यांनी केले.

कुंडल (सांगली) येथील वन प्रबोधनीत पात्र ठरलेले वनरक्षक उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते. वनरक्षक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचा भाग म्हणून राज्यामध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन करून विविध ठिकाणी भेटी देऊन वेगवेगळ्या विभागातील वृक्षांचे प्रकार, वनांचे प्रकार, वनक्षेत्र , अभयारण्य व नाविन्यपूर्ण तसेच पथदर्शक प्रकल्पांचा अभ्यास व त्याची माहिती दौऱ्या दरम्यान दिली जाते. याच अभ्यास दौऱ्याचा भाग म्हणून या प्रशिक्षणार्थींनी शुक्रवार, दि ६ रोजी कर्जत सर्व सामाजिक संघटनेच्या वृक्षसंवर्धन आणि त्या कार्याची माहिती घेतली.

सामाजिक संघटनेच्या या नावीन्यपूर्ण कामाची मुक्तकंठाने प्रशंसा करीत विविध वृक्ष लागवड, त्याचे जतन आणि संवर्धनासाठी घेतलेल्या कार्याची नोंदी संघटनेच्या सेवानिवृत्त वन अधिकारी अनिल तोरडमल यांच्याकडून घेतली. या अभ्यास दौऱ्यात ४० प्रशिक्षणार्थी महिला व पुरुष वनरक्षकांचा समावेश होता.

सर्व सामाजिक संघटनेच्या पर्यावरण संवर्धनाचे कार्य आणि नाव ऐकले होते. तब्बल १ हजार ९५४ दिवसांपासून स्वच्छ, सुंदर आणि हरीत कर्जतसाठी ध्येयवेडे श्रमप्रेमी राबत आहे. वृक्ष लागवड, त्याचे जतन यातून बहरलेले फुलझाडे, लगडलेले फळे या कामाची पावती असून त्याचा अभ्यास आमच्या वनरक्षक उमेदवारांना व्हावा यासाठी कर्जत भेट आयोजित केली होती.

# बेलापूर-परळी रेल्वेमार्गासाठी उद्यापासून उपोषण

## बेलापूर परळी रेल्वे कृती समितीचा इशारा

**श्रीरामपूर :** बेलापूर - परळी रेल्वेमार्गाला केंद्र सरकारने तात्पुरती स्थगिती देत सन २०२२ पासून मंजुरीसाठी प्रलंबित ठेवल्यामूळे केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात पुन्हा एकदा बेलापूर परळी रेल्वे कृती समितीने नेवासा तालुक्यातील कुकाणा येथे उद्या सोमवार दि.९ फेब्रुवारीपासून उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला आहे.

बेलापूर-परळी या रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पूर्ण होऊन हा सर्वेक्षण अहवाल जून २०२२ मध्येच केंद्रीय मंजुरीसाठी रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आला. परंतु आरोआरचे कारण देत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवी यांनी गेल्या तीन वर्षापासून या रेल्वेमार्गाला मंजुरीसाठी प्रलंबित ठेवले असल्याचा आरोप कृती समितीने केला आहे. यापेक्षा नगर-बीड-परळी, बारामती-लोणंद-फलटण, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या सर्व रेल्वेमार्गाचा आरोआरचे बेलापूर-परळी रेल्वेमार्गापेक्षा दुप्पट आहे. या सर्व रेल्वेम ार्गाला मंजुरी देऊन त्या रेल्वेमार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. या सर्व बाबी बेलापूर - परळी रेल्वे कृती समितीने केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच रेल्वे बोर्डाचे चेअरमन यांना कागदोपत्री पुरावे देऊन निदर्शनास आणून दिलेल्या आहे.

## श्रीरामपुरातून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील गोंधवणी परिसरात राहणारा साडेसतरा वर्षे वयाचा अल्पवयीन मुलगा हिरो कंपनीची स्कुटी घेवून मी बाहेर जाऊन येतो, असे सांगून घराबाहेर पडला. तो परत आलाच नाही.सदर मुलगा आई वडीलांसह गोंधवणी परिसरात राहत होता. काल दुपारी तो हिरो कंपनीची स्कुटी घेवून मी बाहेर जाऊन येतो, असे सांगून घराबाहेर पडला. मात्र तो पुन्हा घरी आला नाही. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसात मुलाच्या आईने तक्रार दिली असून पोलिसांनी मिसिंग नोंद केली आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# पाथर्डी-शेवगावच्या विकासाला गती; जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा कंदील

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरातील रामगीरबाबा टेकडी, मेहरटेकडी, इंदिरानगर तसेच शेवगाव शहरातील रामनगर, शामनगर, इंदिरानगर, वाल्मीकनगर, वडारवस्ती, बजरंगनगर शासकीय जागेवरील घरांसाठी पट्टे वाटप करणे. पाथर्डी तालुका क्रीडा संकुलासाठी निवडुंगे शिवारातील जमीन हस्तांतरीत करणे, पाथर्डी नगरपालिकेच्या अग्नीशमन केंद्रास शासकीय जागा मिळणे, शेवगाव पोलीस स्टेशन व कर्मचारी वसाहतीसाठी जुन्या तहसील कार्यालयाची जागा मिळावी आदि प्रश्नाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असुन लवकरच या समस्या मार्गी लागणार असल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.

पाथर्डी व शेवगाव शहर व तालुक्यातील गेली अनेक वर्षापासुन प्रलंबीत प्रश्नाबाबत शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या उपस्थितीत व आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही तालुक्यातील अधिकारी व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वच प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत सबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, जिल्हा क्रीडा अधिकारी खुरांगे, पाथर्डीचे तहसिलदार उद्धव नाईक, शेवगावचे तहसिलदार अकाश दहाडदे, नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी योगेश खैरे, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, उपनगराध्यक्षा मंगलताई कोकाटे, पाथर्डी नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, शेवगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी भुमि अभिलेखचे उपाधिक्षक निखील मोरे, नगरसेविका डॉ.शारदा गर्जे, म निषा उदमले, नगरसेवक, डॉ. जगदीश मुने, प्रतिक नांगरे, शेवगाव नगरपरिषदेचे नगरसेवक नितीन दहिवाळकर, सागर फडके, कमलेश गांधी, विनायक मोहिते, डॉ. निरज लांडे, कैलास तिजोरे, खंडू बुलबुले, राहुल वरे, बापुराव धनवडे, राहुल सावंत, राहुल मालुसरे, अभिनव अंधारे, भुषण देशमुख, किरण पवार, अनिल वडागळे, सचिन अदमाने, अजय भास्कर आदी प्रमुख उपस्थित होते.



यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले की उपविभागीय अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील समीतीने सर्व्हे व मोजणी करून सर्वांना घरे या योजने अंतर्गत पट्टे वाटपाचे नियोजन करावे, पाथर्डी शहरातील रामगीरबाबा टेकडी,मेहर टेकडी, इंदिरानगर येथील अतिक्रमणधारकांचे सात बारा वर नाव लावण्यासाठी समितीने सर्व्हेक्षण करून प्रस्ताव सादर करावा.

पाथर्डी नगरपरिषदेच्या अग्नीशमन केंद्रासाठी शासकीय जागा आठ दिवसात हस्तांतरीत करण्यात येईल, पाथर्डी तालुका क्रीडा संकुलाची जागा हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पंधरा दिवसात पूर्ण करावी, पाथर्डी शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, शेवगाव पोलिस ठाणे व कर्मचारी वसाहतीसाठी जागा मोजणी करून तातडीने प्रस्ताव सादर करावा, दातीरवाडी येथे सेवाभवन बांधण्यासाठी गायरान जागा तातडीने उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच शेवगाव शहरातील रामनगर, शामनगर, इंदिरानगर व वाल्मिकवस्ती, वडारवस्ती, बजरंगनगर या सर्व जागांचे सर्व्हे करून समितीने निर्णय घ्यावेत. तसेच आवश्यक त्या बाबीसाठी समितीने कॅम्प लावण्यात यावेत असेही जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी यावेळी सांगितले.

# मोहिनीराज यात्रेनिमित्त कुस्त्यांच्या हगाम्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त यात्रा कमिटीच्या वतीने नेवासा येथील जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात कुस्त्यांच्या हंगाम्याच्या शुभारंभ प्रसंगी युवक मल्लांसह बाल मल्लांनी देखील सहभाग नोंदवला. स्व. साहेबराव घाडगे यांची कुस्त्यांविषयी असलेली आवड लक्षात घेऊन येथून पुढे ही कुस्त्यांच्या स्पर्धांना प्रोत्साहन देत राहू अशी ग्वाही अँड. सुमतीताई घाडगे यांनी यावेळी बोलतांना दिली.

कुस्ती स्पर्धेचे उद्धाटन त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अँड.सुमतीताई घाडगे, विश्वस्त चेतन चव्हाण, सचिव मनिष घाडगे, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,पोलीस निरीक्षक महेश पाटील,यात्रा कमिटीचे कुस्ती विभाग प्रमुख अँड संजय सुखदान,राष्ट्रीय पंच संभाजी निकाळजे,प्राचार्य सोपान काळे सर यांच्या हस्ते बजरंग बलीच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी सुमतीताई घाडगे म्हणाल्या की स्व. साहेबराव घाडगे यांना कुस्ती खेळाविषयी आवड होती. ग्रामीण भागातील मल्ल ऑलिम्पिकमध्ये देखील खेळले पाहिजे अशी त्यांची आंतरिक तळमळ होती.यासाठी त्यांनी कुस्ती स्पर्धांना पाठबळ देऊन थोड्या मोठया मल्लांच्या पाठीवर थाप टाकली होती त्यामुळे मल्लांना कुस्ती खेळण्यासाठी मोठी ऊर्जा प्राप्त होत होती त्यांचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कुस्ती खेळांना प्रोत्साहित करण्याचे काम आम्ही करू अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलतांना दिली.

नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक म हेश पाटील यांनी सर्व कुस्ती पटूंनी खिळाडूवृत्तीने खेळ करावा माऊलींच्या या भूमीत कला क्रीडा,सांस्कृतिक वैभव वाढीसाठी तसेच या भूमीला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी अशा स्पर्धांना पाठबळ द्या, स्पर्धेसाठी सहकार्य करावे असे आवाहन करून शुभेच्छा दिल्या.

कुस्तीच्या झालेल्या उदघाटन प्रसंगी माजी नगराध्यक्ष सतीश पिंपळे,गफुर बागवान,प्रकाश सोनटक्के,अंबादास लष्करे,हिरामण धोत्रे,नगरसेवक स्वप्नील राजेंद्र मापारी, संभाजी धोत्रे,अंकुश म्हस्के, निरंजन डहाळे,राजू काळे, अनिल शिंदे, योगेश रासने,जयदीप जामदार,सौरभ मुनोत,दीपक धोत्रे,हारुण जहागिरदार,जालिंदर गवळी, पप्पू डुकरे,जयंत मापारी,मास्टर सुरेश लव्हाटे,बाबासाहेब पवार यांच्यासह यात्रा कमिटीचे सर्व सदस्य नेवासकर नागरिक व कुस्ती प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात्रा कमिटीचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर कुस्ती स्पर्धा मार्गदर्शक अँड.संजय सुखदान यांनी प्रमुख अतिथींचे आभार मानले.छोट्या मल्लांच्या कुस्तीने कुस्त्यांच्या हगाम्याचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले शेकडो मल्लांनी यावेळी हजेरी लावली होती.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.०८ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## उच्चशिक्षित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**बीड** : उच्चशिक्षित तरुणाने जनावरांच्या गोठ्यासमोरील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.६) राक्षसभुवन-तांबा (ता. शिरुर कासार )येथे घडली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही, शिरुर पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.राक्षसभुवन (तांबा) येथील अनंता प्रभाकर खोले वय ३७ वर्षे या उच्चशिक्षित तरुणाने पैठण- पंढरपूर मार्गालगतच्या शेतातील जनावरांच्या गोठ्यासमरील लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीने पहाटे गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. दिपक खोले यांच्या माहितीवरून शिरुर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन शवविच्छेदनासाठी प्रेत हालावलेश. शिरुरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले. शिरुर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# जलसंपदाच्या पाचव्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना प्रारंभ

## सुदृढ शरीरातूनच उत्तम प्रशासन घडेल : जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** खेळामुळे सांघिक भावना वाढीस लागते. मनातील अहंकार गळून पडतो. आपल्या प्रशासकीय कामकाजात व वैयक्तिक आयुष्यातही या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे केवळ स्पर्धेपुरते न खेळता, व्यायामाचा हा मंत्र आयुष्यभर जपा. यातूनच चांगले आरोग्य, सकारात्मक मानसिकता व पर्यायाने एक उत्तम प्रशासन घडेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या वतीने लोणी - शिर्डी येथे आयोजित जलसंपदा विभागाच्या 'पाचव्या राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा-२०२६' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जलसंपदा मंत्री महाजन म्हणाले, मी स्वतः शालेय जीवनापासून खेळाशी जोडलेलो आहे. एक खेळाडू म्हणून मला खेळाचे महत्त्व जवळून माहित आहे.सुदृढ मनामुळे कामात एकाग्रता वाढते, चिडचिड होत नाही व कामाचा अतिरिक्त ताण जाणवत नाही.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, सहकाराचा वारसा लाभलेली ही भूमी आता क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करत आहे. ज्याप्रमाणे सहकारातून विकासाची दिशा मिळते, तसेच खेळाच्या माध्यमातून प्रशासनात शिस्त व सांघिक भावना रुजविण्याचे आमचे ध्येय आहे.



अपर मुख्य सचिव कपूर म्हणाले, स्पर्धेत केवळ सहभाग महत्त्वाचा नसून जिंकण्याच्या जिद्दीनेच खेळा. क्रीडांगणात उतरल्यावर विजय मिळवण्याच्या उद्देशानेच खेळले पाहिजे. मंत्रालयातील दैनंदिन कामातून वेळ काढत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सरावाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमात अर्जुन पुरस्कारार्थी भारतीय कबड्डी संघाचे माजी कर्णधार पंकज शिरसाठ, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी आंतरराष्ट्रीय बेसबॉल खेळाडू अक्षय आव्हाड व शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी खो-खो खेळाडू श्वेता गवळी यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर सचिव (लाभक्षेत्र विकास) संजय बेलसरे, मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्मिता विखे पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिमनवार यांनी केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून व शानदार पथसंचलनाने स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्पर्धेचा शुभंकर असलेल्या 'जलवीर' व विजेता चषकाचे अनावरणही करण्यात आले. उपस्थित मान्यवर व खेळाडूंनी क्रीडा विकासाची शपथ घेतली. कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते 'क्लॅपर' वाजवून १०० मीटर धावण्याच्या शर्यतीचा प्रारंभ करण्यात आला.

जलसंपदा विभागाच्या या राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान लोणी व शिर्डी येथे पार पडणार आहेत.

या स्पर्धेमध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, थलेटिक्स, कॅरम, जलतरण, टेबल टेनिस, बुद्धिबळ व बॅडमिंटन या खेळांचा समावेश आहे.

यासाठी मंत्रालय स्तर, विविध महामंडळे तसेच क्षेत्रीय आस्थापनांमधील संघ व खेळाडू उपस्थित राहिले आहेत. विभागीय, मंडळ व महामंडळ स्तरावर पारदर्शक निवड प्रक्रिया राबवून अंतिम फेरीसाठी ११ विभागांतील संघांची निवड करण्यात आली आहे. महोत्सवात एकूण ९ क्रीडा प्रकार व सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असून, यात ४८० महिला व ९७० पुरुष खेळाडू सहभागी झाले आहेत. ९ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे या महोत्सवाचा समारोप होईल.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तौरल इंडियाच्या सुपा प्लांटचे आज उद्घाटन

## भरत गीते यांची माहिती; १२०० हून अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सुपा :** ॲल्युमिनियम सँड कास्टिंगमध्ये देशातील अग्रगण्य असलेल्या पुण्यातील तौरल इंडियाच्या सुपा येथील उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. सुपा एमआयडीसी (अहिल्यानगर) येथे येत्या रविवारी (ता. ८ फेब्रुवारी) सकाळी १० वाजता हा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे, अशी माहिती 'ल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' व तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी मुख्य कार्यपालन अधिकारी उमाकांत शिवणकर, कॉर्पोरेट कम्युनिकेशन्सचे सहायक व्यवस्थापक निलेश जायभाये उपस्थित होते.

भरत गीते म्हणाले, आत्मनिर्भर भारताचे ध्येय घेऊन सुरु केलेल्या तौरल इंडियाने चाकणनंतर आता दुसरा उत्पादन प्रकल्प सुपा एमआयडीसीमध्ये उभारला आहे. या प्रकल्पामध्ये अत्याधुनिक ल्युमिनियम सँड कास्टिंग उत्पादन होणार आहे. हा प्रकल्प अहिल्यानगर जिल्ह्यासाठी एक महत्त्वाचा औद्योगिक टप्पा ठरणार असून, परिसरातील आर्थिक विकासाला नवे बळ देणार आहे. तसेच या उत्पादन प्रकल्पामुळे १,२०० हून अधिक रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

सुमारे १२ लाख चौरस फुट क्षेत्रफळावर उभारलेला हा प्रकल्प या भागातील सर्वात मोठ्या ल्युमिनियम कास्टिंग उत्पादन केंद्रांपैकी एक आहे. उत्पादन पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर येथे १,२०० हून अधिक थेट रोजगार निर्माण होणार असून, यासोबतच वाहतूक, लॉजिस्टिक्स, देखभाल, स्थानिक पुरवठादार, खानावळ सेवा आणि लघुउद्योगांमधून मोठ्या प्रमाणावर अप्रत्यक्ष रोजगार संधीही उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पामुळे सुपा परिसरात आधुनिक औद्योगिक संधी उपल्बध होऊन स्थानिक युवकांना आपल्या गावाजवळच स्थिर व कौशल्याधारित रोजगार मिळणार आहे. त्यामुळे महानगरांकडे स्थलांतर करण्याची गरज कमी होणार आहे. तौरल इंडिया स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम, शॉप-फ्लोअर प्रशिक्षण आणि सुरक्षा-केंद्रित औद्योगिक पद्धती राबविण्यावर भर देणार आहे, असे भरत गीते यांनी सांगितले.

दावोस येथे २०२५ मध्ये झालेल्या ५०० कोटींच्या सामंजस्य करारातून वर्षभरातच हा प्रकल्प साकारला आहे. राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीचे प्रत्यक्ष विकासात रूपांतर केल्याचे हे उत्तम उदाहरण आहे. हा प्रकल्प रेल्वे, ऊर्जा, मोबिलिटी, संरक्षण व औद्योगिक पायाभूत सुविधा क्षेत्रांसाठी उच्च दर्जाचे ल्युमिनियम घटक निर्मिती करणार असून, सुपा व अहिल्यानगरला प्रगत उत्पादनाचे नवे केंद्र म्हणून ओळख मिळवून देणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# चांगला रस्ता द्या हो

## नेवासा तालुक्यातील गोणेगावकरांचा टाहो.!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** रस्त्यावर पडलेले मोठे-मोठे खड्डे आणि जीव धोक्यात घालून खड्डा चुकवत त्यातून कसाबसा मार्ग काढणारे वाहनधारक, शालेय विद्यार्थी-विद्यार्थी अशी पाणंद रस्त्यासारखी अवस्था सध्या नेवासे तालुक्यातील नेवासे- राहुरी रस्त्यालगतच्या गोणेगाव चौफुली ते गोणेगाव झाली आहे. दोन-अडीच किलोमीटर असणाऱ्या या रस्त्याची सध्या अक्षरश चाळण झाली असून दररोज होणारे अपघात, बंद पडणाऱ्या गाड्यांना वाहनधारक वैतागले आहेत. हा रस्ता कमी आणि खड्डे जास्त असा झाला असून गोणेगावकरांचा हा जिवघेणा प्रवास थांबणार कधी? असा सवाल ग्रामस्थ करत आहे.



नेवासे तालुक्यातील गोणेगाव रस्ता हा वडाळा बहिरोबा-खरवंडी-गोणेगाव चौफुला-गोणेगाव-पाचेगाव ते श्रीरामपूर असा शॉर्ट कट असत्याने या रस्त्यावर चारचाकी, दुचाकींसह सर्वच वाहनांची नेहमीच वर्दळ असते. या रस्त्यावर ठीक-ठिकाणी मोठमोठे खड्डे, खडी उघडी पडलेले असून साईड पट्ट्याही उघड्या पडल्याने या रस्त्यावर सातत्याने अपघाताच्या मालिका पाहायला मिळत आहेत. गोणेगाव चौफुली ते गोणेगाव रस्त्याची दुरवस्था ही वाहनचालक व नागरिकांसाठी कायमची मोठी समस्या असून या रस्त्याची झालेली डागडुजी अल्पआयुषी ठरली असून रस्त्यावरील दुरुस्तीचे काम करूनही रस्त्याची अवस्था जैसेथेच राहत असल्याने खड्डे दुरुस्ती वर होणारा खर्च मातील गेल्यांने या रस्त्यावर पुन्हा मोठमोठे खड्डे पाहायला मिळतात. त्यामुळे तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी या रस्त्या प्रश्नी गांभीर्याने दखल घेवून रस्त्याची दुरुस्ती तातडीने व्हावी अशी अपेक्षा ज्येष्ठ कार्यकर्ते बाबुराव रोडे, प्रा गोवर्धन रोडे, गोकुळ चिंधे, दिनकर काळे, अनिल काळे, प्रकाश रोडे, राहुल रोडे यांच्यासह गोणेगावकरांनी व्यक्त केली आहे.

- रस्त्याची दुरवस्था झालेल्याने वाहनचालकांसह ज्येष्ठ नागरिकांना या खड्डेमय रस्त्याचा ज्येष्ठ नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता दुरुस्ती अती महत्त्वाचे आहे. संबंधित विभागाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अन्यथा ग्रामस्थांचे वतीने तीव्र आंदोलन केले जाईल.

**-विठ्ठलराव शेटे,**
**ज्येष्ठ नेते, गोणेगाव**

- गोणेगाव चौफुला ते गोणेगाव रस्त्याची मोठी दूरवस्था झाली आहे. या रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीसाठी ग्राम पंचायतीचे वतीने संबंधित विभागाकडे अनेकवेळा पाठपुरावा केला आहे. रस्ता तातडीने दुरुस्त न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने जनआंदोलन उभारण्यात येईल.

**-रावसाहेब दिघे,**
**सरपंच, गोणेगाव, ता. नेवासा**

- गोणेगाव चौफुला ते गोणेगाव असा रस्त्यावरून माझा दररोजचा प्रवास कसरतीचा ठरत आहे. या रस्त्यावर गाडी चालवणे म्हणजे जीवाशी खेळल्या प्रमाणे आहे.

**- किरण शेटे,**
**गोणेगाव ग्रामस्थ (नोकरदार)**

# भीमा नदीत हात-पाय बांधलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील निमगाव खलू परिसरात भीमा नदीच्या पात्रात हात-पाय बांधलेल्या अवस्थेत एका अज्ञात पुरुषाचा बेवारस मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

मृतदेहाची अवस्था पाहता हा अपघात नसून घातपात करून मृतदेह नदीत टाकल्याची दाट शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे.

स्थानिक नागरिकांना नदीपात्रात मृतदेह तरंगताना दिसल्यानंतर तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोलिस दाखल होताच पंचनामा करण्यात आला.

मृताच्या हात-पाय बांधलेले असल्याने हा प्रकार अत्यंत संशयास्पद असून, हा थेट खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांमध्ये बेपत्ता व्यक्तींची माहिती तपासली जात असून, तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आहेत.

या घटनेमुळे निमगाव खलू व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, भीमा नदी पुन्हा एकदा गुन्हेगारांसाठी 'डम्पिंग ग्राउंड' तर बनत नाही ना? असा सवाल उपस्थित होत आहे.



# श्री.मोहिनीराज यात्रेच्या काल्याच्या दहीहंडीला भाविकांची गर्दी

## बोल मोहिनीराज की जयच्या गजराने नेवासेनगरी दुमदुमली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा नगरीचे ग्रामदैवत व लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त मुख्य दिवशी शुक्रवारी दि.६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता रेवड्यांची उधळण करत काल्याची दहीहंडी फोडण्यात आली.यावेळी काला घेण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिर प्रांगणात गर्दी केली होती. यात्रा महोत्सव काळात लाखो भाविकांनी भगवान विष्णूंच्या स्त्रीरूप मोहिनी अवताराचे दर्शन घेतले.

श्री मोहिनीराजांच्या यात्रा महोत्सवाला रथसप्तमी पासून प्रारंभ झाला होता. सप्ताहभर येथे भागवत कथा उत्साहाच्या वातावरणात पार पडली त्यानंतर माघ पौर्णिमेला भळंदचा कार्यक्रम होऊन सोमवार दि.२ फेब्रूवारी पासून श्री मोहीनीराजांच्या उत्सवमूर्ती समोर महाप्रसादाच्या पंगती बसल्या. सायंकाळच्या सुमारास झालेल्या महाप्रसाद पंगतीच्या कार्यक्रमांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

श्री मोहिनीराजांच्या यात्रा उत्सव काळात देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज,सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धव महाराज मंडलिक, वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के,महंत रमेशानंदगिरी महाराज,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,माजी मंत्री शंकरराव गडाख,माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांनी येथे भेट देऊन उत्सवमूर्ती मोहिनीराजांचे दर्शन घेतले. शुक्रवारी दि.६ फेब्रुवारी रोजी यात्रेच्या मुख्य दिवशी श्री मोहिनीराज मंगल कार्यालयामध्ये दुपारी उत्सवमूर्ती समोर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला त्यानंतर सायंकाळी ५.४५ च्या सुमारास पाकशाळा येथे जिल्हा न्यायाधीश हरिभाऊ वाघमारे यांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आली.बोल मोहिनीराज की जयअसा जयघोष करत व गुलालाची उधळण करत पालखीचे श्री मोहिनीराजांच्या मंदिराकडे प्रस्थान झाले यावेळी टाळमृदुंग व सनई चौघडयाचा गजर करत आलेल्या पालखी मिरवणुकीचे सुवासिनींनी औक्षण करून स्वागत केले.

सायंकाळी ६ वाजता पालखीचे आगमन श्री मोहिनीराजांच्या मंदिर प्रांगणात झाल्यानंतर येथे रेवड्यांची उधळण करत हजारो भाविकांच्या उपस्थितीत पाटील घराण्यातील मानाप्रमाणे बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी उधळलेल्या रेवड्या झेलण्यासाठी व काला घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. देशपांडे गल्लीमध्ये तर घरोघरी काल्याचे वाटप करण्यात आले.गोल्डन ग्रुप व छत्रपती संभाजी महाराज मित्र मंडळाच्या वतीने भाविकांना काला वाटण्यात आला. काल्याचा प्रसाद घेण्यासाठी श्री मोहिनीराज मंदिर प्रांगण गर्दीने फुलून गेले होते. तर मुख्यपेठेला ही यात्रेमुळे मोठी गर्दी झाली होती. यात्रेनिमित्त रात्रभर पालखी ग्राम प्रदक्षिणेसाठी निघाली यावेळी सुवासिनींनी पंचारती ओवाळून उत्सवमूर्तीचे औक्षण केले. तोफांची सलामी व फटाक्यांची आतषबाजीने ग्रामप्रदक्षिणेसाठी निघालेल्या पालखीचे उत्स्फुर्त स्वागत नेवासा शहरासह मुख्य पेठेत व नेवासा बुद्रुक व परिसरात करण्यात आले. यात्रेनिमित्त नेवासा शहरात विविध संघटना व संस्थेच्या वतीने चौकाचौकात स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या.नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व होमगार्ड यांचा चोख बंदोबस्त चौकाचौकात ठेवण्यात आला होता.



नेवासा गावचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज यात्रेनिमित्त मुख्य मूर्ती उत्सव मूर्ती व काल्याच्या प्रसंगी झालेली गर्दी दिसत आहे. (छाया-सुधीर चव्हाण नेवासा)